| धाराशिव | वर्ष २५ वे | अंक २५१ वा | शुक्रवार दिनांक १९ डिसेंबर, २०२५ | पृष्ठे ६ | किंमत ०१ ₹ RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## भोंजा हवेली येथे हजारो शेतकऱ्यांच्या उपस्थितीत केळी उत्पादक शेतकरी परिसंवाद संपन्न

# AI तंत्रज्ञान, मनरेगा व शासकीय योजनांच्या माध्यमातून शेतकऱ्यांनी शेतीत परिवर्तन घडवावे -जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार





धाराशिव दि.१७ डिसेंबर (जिमाका) परंडा तालुक्यातील भोंजा हवेली हे छोटेसे खेडेगाव; मात्र आज ते प्रगत शेतीचे आणि शेतकरी आत्मनिर्भरतेचे प्रेरणास्थान ठरत आहे.आज दि.१७ डिसेंबर रोजी भोंजा हवेली येथे हजारो शेतकऱ्यांच्या उपस्थितीत भव्य केळी उत्पादक शेतकरी परिसंवाद उत्साहात पार पडला.या परिसंवादाने कोरडवाहू शेतीतून बागायतीकडे वळणाऱ्या शेतकऱ्यांच्या यशकथांना नवी दिशा दिली.

भोंजा हवेली गावातील सुमारे ९० टक्के शेतकरी पारंपरिक कोरडवाहू शेतीतून बाहेर पडत ऊस शेतीला बगल देऊन केळी व तुती लागवडीकडे वळले आहेत.मनरेगा अंतर्गत फळबागा,सिंचन सुविधा आणि तुती लागवड यामुळे अनेक शेतकरी गुरुवारी लखोपती बनत आहेत.या यशस्वी परिवर्तनाची दखल घेत जिल्हा प्रशासन थेट शेतकऱ्यांच्या दारी पोहोचले.

जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार,जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनाक घोष,जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राजकुमार मोरे,आत्माचे प्रकल्प संचालक श्री.मिसाळ,उपविभागीय कृषी अधिकारी श्री.भागवत सरडे,रेशीम विकास अधिकारी श्रीमती वाकुरे,तालुका कृषी अधिकारी नानासाहेब लांडगे व सुमित सोनटक्के आदी अधिकाऱ्यांनी आपल्या संपूर्ण तांत्रिक पथकासह परिसंवादास उपस्थित राहून शेतकऱ्यांना प्रत्यक्ष मार्गदर्शन केले.

परिसंवादात केळी लागवड व्यवस्थापन तज्ज्ञ सोमनाथ हुलगे यांनी शेतकऱ्यांना न खचता केळी लागवडीकडे वळण्याचे आवाहन केले.डबल ओळीतील केळी लागवड,ठिंबक सिंचनाचा वापर आणि आलटापालट पिके घेण्यावर भर देत यामुळे उत्पादन वाढते,असे त्यांनी सांगितले.केडी एक्सपर्टचे सर्वेसर्वा किरण डोके यांनी केळी ही कमी पाण्यात परवडणारी फळबाग असून रोगराईला कमी बळी पडणारी टिश्यू कल्चर रोपे निवडण्याचा सल्ला दिला.केळी उत्पादनाच्या निर्यात व स्टोरेजची हमी देण्याचे आश्वासनही त्यांनी यावेळी दिले.

श्री.किरण चव्हाण यांनी केळी लागवडीचा हंगाम व बाजारभाव याविषयी मार्गदर्शन केले,तर कृषी विज्ञान केंद्राचे डॉ. अरुण गुट्टे यांनी ऊस पिकाबाबत सखोल माहिती दिली.

जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनाक घोष यांनी शेतकऱ्यांनी एआय (AI) तंत्रज्ञानाचा वापर करून शेतीत क्रांती घडवावी, असे आवाहन केले.मनरेगाअंतर्गत फळबाग, तुती लागवड, सिंचन विहीर, भाऊसाहेब फुंडकर योजना तसेच महाडीबीटीअंतर्गत शेतीसाठी लागणाऱ्या साहित्यावर शासकीय अनुदानाचा लाभ घ्यावा,असे त्यांनी सांगितले. यानंतर मान्यवरांनी थेट शेतात जाऊन रणनवरे यांच्या तुती लागवडीला व मोरे यांच्या केळी लागवडीला भेट देत शेतकऱ्यांचे कौतुक केले.या गावातून उभारण्यात आलेली श्री.पाटील बुवा जिल्हा परिषद प्रोड्युसर कंपनी ही अभिमानास्पद बाब असून या कंपनीअंतर्गत गावातच माती परीक्षण केंद्र सुरू होणार असल्याची माहिती देण्यात आली.यावेळी डायरेक्टर गणेशदादा नेटके यांच्या श्री.गणेश बँक सेवा केंद्रालाही भेट देण्यात आली.यावेळी जिल्हाधिकारी व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी प्रायोगिक तत्त्वावर केळी व तुतीची लागवड केली.

कार्यक्रमास सरपंच सौ.राणी कोळी, उपसरपंच आकुबाई घाडगे,तहसीलदार निलेश काकडे, गटविकास अधिकारी मोहन राऊत, तालुका कृषी अधिकारी (भूम, लोहारा, उमरगा, तुळजापूर, वाशी),मंडळ कृषी अधिकारी, सहाय्यक कृषी अधिकारी तसेच आजी-माजी सरपंच,उपसरपंच, प्रतिष्ठित नागरिक व बचत गटाच्या महिला पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाहीर शरद नवले यांनी केले,तर आभार सहाय्यक कृषी अधिकारी रेशमा कामटे यांनी मानले.हा परिसंवाद केवळ मार्गदर्शनापुरता मर्यादित न राहता, शेतकरी आत्मनिर्भरतेकडे वाटचाल करणारा नवा विश्वास देणारा ठरला,अशी भावना उपस्थित शेतकऱ्यांनी व्यक्त केली

## क्राईम न्युज

### लग्नास गेल्याने सोन्या-चांदीसह रोख रकमेची चोरी

धाराशिव (प्रतिनिधी)- शहर पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी शुध्दोधन अशोक गायकवाड, वय २७ वर्षे, रा. कुरणेनगर धाराशिव ता. जि. धाराशिव हे त्यांचे कुटुंबिय लग्नासाठी लातुर येथे गेले असता त्यांचे राहते घराचे दरवाज्याच्या मोकळ्या फटीतुन अज्ञात व्यक्तीने दि.१४.१२.२०२५ रोजी आत प्रवेश करुन घरातील १३ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने, चांदीचे दागिने व रोख रक्कम ९६,००० असा एकुण १,६५,५१३ किंमतीचा माल चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-शुध्दोधन गायकवाड यांनी दि.१७.१२.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन धाराशिव शहर पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

### रत्नागिरीस जाताच चोरट्याने घर साफ केले

धाराशिव (प्रतिनिधी)- आनंदनगर पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी दिपक शिवाजी शेरखाने, वय ६३ वर्षे, रा. वरुडा रोड, समर्थ नगर धाराशिव ता. जि. धाराशिव हे त्यांचे कुटुंबिय रत्नागिरी येथे गेले असता त्यांचे राहते घराचे कुलूप अज्ञात व्यक्तीने दि.३०.११.२०२५ रोज आत प्रवेश करुन घरातील १७ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने, चांदीचे दागिने व रोख रक्कम १०,००० असा एकुण ६१,७७० किंमतीचा माल चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-दिपक शेरखाने यांनी दि.१७.१२.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन आनंदनगर पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

### दोन म्हैस व रेडकुची चोरी

तामलवाडी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी नामे-विकास अरविंद मुळुक, वय २९ वर्षे, रा. नांदुरी ता. तुळजापूर जि. धाराशिव यांच्या त्यांचे नांदुरी शिवारातील शेतात गोठ्यातील दोन म्हैस व एक रेडकु असे एकुण ९०,००० किंमतीचे दि. १६.१२.२०२५ रोजी २०.०० ते दि.१७.१२.२०२५ रोजी ०६.०० वा. सु. अज्ञात व्यक्तीने चोरुन नेले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-विकास मुळुक यांनी दि.१७.१२.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन तामलवाडी पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## मोहेकर महाविद्यालयातील ‘आट्यापाट्या’ स्पर्धेत ११ खेळाडूंची विभागस्तरीय स्पर्धेसाठी निवड



कळंब (प्रतिनिधी): येथील शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालयाच्या आट्यापाट्या संघाने जिल्हास्तरीय स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावत उत्तुंग यश संपादन केले आहे. या विजयी संघातील ११ खेळाडूंची आता विभागस्तरीय आट्यापाट्या स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

नुकत्याच कळंब येथील क्रीडा संकुल येथे जिल्हास्तरीय आट्यापाट्या क्रीडा स्पर्धा पार पडल्या. या स्पर्धेत मोहेकर महाविद्यालयाच्या संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत प्रथम क्रमांक मिळविला. विभागस्तरीय स्पर्धेसाठी निवड झालेले विद्यार्थी खालीलप्रमाणे:

समर्थ सोनाजी झाडके,ऋषिकेश बिभीषण डोंगरे,ओम बालासाहेब शिंदे,अभिषेक दत्तात्रय भागुडे,सागर बाळासाहेब जाधव,मुजाहीद अकबर तांबोळी,अजिंक्य दत्तात्रय पवार,प्रथमेश मनोज अंधारे,अभिनव लक्ष्मण मोरे,यश राजू साळुंखे,शुभम संजय जाधवर.

विद्यार्थ्यांच्या या देदीप्यमान यशाबद्दल ज्ञानप्रसारक मंडळ येरमाळा संस्थेचे सचिव डॉ. अशोकराव मोहेकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हेमंत भगवान, उपप्राचार्य प्रा. जयवंत भोसले, उपप्राचार्य डॉ. के. डी. जाधव, तसेच प्रा. विलास अडसूळ यांनी सर्व खेळाडूंचे अभिनंदन केले आहे. तसेच महाविद्यालयाचे क्रीडा शिक्षक प्रा.सरस्वती वायभसे , सर्व विभागप्रमुख, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी निवड झालेल्या खेळाडूंना पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## पोदार प्रेप, धाराशिवमध्ये शाळेतच घेण्यात आली ‘रेल्वे स्टेशन’ थीमॅटिक टूर



पोदार प्रेप, धाराशिव येथे १५ ते १९ डिसेंबर या कालावधीत विद्यार्थ्यांसाठी शाळेतच ‘रेल्वे स्टेशन’ या थीमवर आधारित थीमॅटिक टूर चे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवासारखा शैक्षणिक आभास देणे हा होता. शाळेच्या परिसरातच तिकीट बुकिंग काऊंटर, प्लॅटफॉर्म, रेल्वे सिग्नल, आणि ट्रेनचे स्टेशनवर आगमन अशा संकल्पनांची मांडणी करण्यात आली. विद्यार्थी रेल्वे प्रवासी, तिकीट तपासनीस, गार्ड आदींच्या भूमिकेत सहभागी झाले.

या सृजनशील उपक्रमातून मुलांनी रेल्वे व्यवस्थापन, प्रवासातील शिस्त, आणि वेळेचे महत्त्व* प्रत्यक्ष कृतीद्वारे शिकले. मुलांचा आनंद द्विगुणित झाला कारण त्यांनी अभिनय, निरीक्षण आणि संवाद अशा विविध कौशल्यांचा अनुभव घेतला. हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी ज्ञानवर्धक, मनोरंजक आणि संस्मरणीय ठरला.

## साधन, नवी दिल्ली आणि अनिक फायनान्शिअल सर्व्हिसेस यांच्या संयुक्त विद्यमाने आर्थिक साक्षरता कार्यशाळा संपन्न

कळंब(प्रतिनिधी)- तालुक्यातील हसेगाव के. येथील पर्याय सामाजिक संस्था कॅम्पस मध्ये दिनांक १८ डिसेंबर २०२५ रोजी महिला बचत गट सदस्य आणि फायनान्स कर्मचारी यांच्यासाठी आर्थिक साक्षरता कार्यशाळा संपन्न झाली.

या कार्यक्रमासाठी साधन संस्थे कडून मेहताब आलम तसेच अनिक फायनान्शिअल सर्व्हिसेस चे व्यवस्थापकीय संचालक माननीय विश्वनाथ तोडकर, मुख्यालयाचे माननीय यशवंत आहेर, तेजश्रीताई तोडकर, अनिक धाराशिव जिल्हा ऑपरेशन हेड विलास गोडगे, तसेच अनिकचे संचालक ऋषिकेश तोडकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

या आर्थिक साक्षरता कार्यशाळेसाठी गटप्रमुख महिला तसेच अनिक धाराशिव अंतर्गत सर्व शाखांमधील कर्मचारीवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

या कार्यशाळेत सा-धन चे मेहताब आलम यांनी खालील महत्त्वाच्या आर्थिक विषयांवर मार्गदर्शन केले.

बँक खाते आणि बचतीचे महत्त्व प्रत्येक व्यक्तीने सुरक्षित संस्थेत बँक खाते उघडून नियमित बचत करणे व आपत्कालीन गरजांसाठी आर्थिक शिस्त ठेवणे आवश्यक आहे.

**बजेटिंग व आर्थिक नियोजन-** उत्पन्न व खर्च यामध्ये समतोल राखण्यासाठी बजेट तयार करणे, गरजा व इच्छा यामधील फरक समजून घेणे आणि भविष्यातील उद्दिष्टांसाठी नियोजन, डिजिटल बँकिंग व सुरक्षित व्यवहार UPI, ATM, मोबाईल बँकिंग यांचा सुरक्षित वापर, झखछ किंवा जढझ कोणालाही न देणे आणि फसवणुकीपासून सतर्क राहणे.

**सरकारी योजना व सामाजिक सुरक्षा-**प्रधानमंत्री जन-धन योजना, विमा योजना, पेन्शन योजना व इतर सामाजिक सुरक्षा योजनांचा लाभ घेण्याचे महत्त्व, कर्ज व्यवस्थापन व क्रेडिट स्कोअर गरजेपुरते व उत्पादक उद्देशासाठीच कर्ज घेणे, वेळेवर परतफेड करणे आणि चांगला क्रेडिट स्कोअर राखणे, आदी विषयावर उपस्थिताना मार्गदर्शन मिळाले.

## माजी विद्यार्थी समिती सदस्य अजय जगताप यांच्या तर्फे शाळेस आसन पट्ट्या



जळकोट (विजय पिसे)- तुळजापूर तालुक्यातील शहापूर जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा येथील माजी विद्यार्थी समितीचे सदस्य श्री.अजय लिंबाजी जगताप यांच्या तर्फे शाळेतील विद्यार्थ्यांना बसण्यासाठी आसन पट्ट्या उपलब्ध करून दिल्या.त्याबद्दल शाळेचे मुख्याध्यापक सचिनकुमार ढेपे, शाळेतील शिक्षक श्री.एकनाथ शिरगुरे,होगाडे लक्ष्मण, गुम्मे शिवानंद,राऊत नागेश, सोनवणे दयानंद, वाघमारे वंदना यांच्यावतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी पालक श्री.जितेंद्र पाटील, सर्व शिक्षक व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.


ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## काँग्रेसमधून गळती रोखणे आवश्यक

काँग्रेसच्या जीवावर मोठे झालेले बरेच का सोडुन जात आहेत. महाराष्ट्रात काय देशात काँग्रेसला उतरती कळा लागल्याची दिसून येत आहे. वास्तविक पुर्वी देशातील जवळपास सर्वच राज्यात काँग्रेसची सत्ता होती. भाजपाचे सुरवातीच्या काळात लोकसभेत दोन खासदार निवडूण आले होते. काँग्रेसमय देश असताना सध्य स्थितीत काँग्रसेची सध्याला आवस्था कशी झाली आहे याचा विचार निष्ठावंतांनी करण्याची गरज आहे. काँग्रेसला बिहारमध्ये मोठी हार पत्कारावी लागली. त्यामुळे आता प. बंगाल असो किंवा तामिळनाडूत काँग्रेसची कोणी आघाडी करेल असे वाटत नाही. मुळात आज काँग्रेस सोडून जाणाऱ्यांची संख्या मोठी आहे. काँग्रेसचा काळ पडका आहे. तरी प्रज्ञा सावंत सारखी मंडळी जर काँग्रेस सोडत असेल तर पक्षाने गांर्भीयाने विचार केला पाहिजे. नुकतेच एक सर्वे करण्यात आला यातही भाजपाची चांगली राजकिय स्थिती दर्शविली आहे. त्याच प्रमाणे भाजपाचे जी शिस्तबद्ध यंत्रणा आहे याला तोड नाही. वरचेवर भाजपाला मिळणारे यश व काँग्रेसच्या पदरी येणारे अपयश याचा विचार काँग्रेसने केला पाहिजे. कार्यकर्ते हे सक्षम बनले पाहिजेत. काही झाले तरी पक्षाची बिघडत चाललेली स्थिती सुधारण्याचा कार्यक्रम हाती घेतला जात नाही. वरचेवर स्थिती बिघडत जात असताना काही तरी उपायोजना केली पाहिजे. कार्यकर्ते जो पर्यंत जपणार नाही तो पर्यंत काँग्रेसची स्थिती सुधारणार नाही. परवाच म्हटले की, एका काँग्रेसच्या जेष्ठ नेत्याचे निधन झाले. त्या मोठ्या नेत्याचे आयुष्य काँग्रेससाठी वेचले त्यांच्या अंतविधीच्यावेळी उपस्थित गांधी घराण्याने राहाणे आवश्यक होते. गांधी घराण्याचे प्रतिनिधी उपस्थित नव्हता. हा संदेश बरेच काही सांगुन जातो. त्यामुळे काँग्रेसने बरेच काही कठोर निर्णय घेण्याची गरज आहे. प्रज्ञा सावंत ह्या खासदार सावंतच्या पत्नी आहेत. सावंत यांचे कार्य पक्षासाठी मोलाचे आहे. त्यांनी ज्यावेळी संसद परिसरात उपोषण केले त्यावेळी राजकिय खळबल माजली होती. त्यामुळे काँग्रेसपक्षाने अशा परिवाराशी संवाद ठेवणे आवश्यक आहे. राहुल गांधी यांनी पहिल्यांदा कार्यकर्त्याचे हीत जपले पाहिजे. कार्यकर्त्यात मोठी नाराजगी निर्माण होत आहे. राहुल गांधी भेटत नाहीत अशी ओरड आहे. त्यापेक्षाही दुर्दैव म्हणजे प्रियंका गांधी वयाने लहान असून खालच्या भाषेत जेष्ठांवर बिनबुडाचे आरोप करीत असतील तर त्यामुळे त्यांची प्रशांसा नाही तर प्रतिमा खालावली जाते हे पक्षाने निदर्शनास आणून दिले पाहिजे. मुळात आपल्या देशात आज काय स्थिती आहे. कोणाचे वाढते वर्चस्व वाढत आहे, याचा विचार करून वाटचाल करणे योग्य आहे. देशात नवखे खासदार व कमी वयाचे असतील त्यांनी जेष्ठावर वयाचा, त्यांच्या अनुभव, त्याच प्रमाणे कार्याचा विचार करून टिका केली पाहिजे. संसदेत जेष्ठ नेते मल्लिकार्जुन खारगे आहेत, त्यांनी टिका केली तरी चालले मात्र नवख्याची टिका न आवडणारी आहे. त्यामुळे जनतेच्या मनात काँग्रेस बाबत आपुलकी निर्माण होण्यापेक्षा तिरस्काराची भावना निर्माण होत आहे. तसे काँग्रेसमध्ये बोलणारी मंडळी दिसून येत नाही. गप्प राहाणारे अधिक आहेत. कपिल सिब्बल असोत किंवा बोटावर मोजण्याइतकी मंडळी असोत, आता काँग्रेसमध्ये स्पष्ट वक्ते दिसून येत नाहीत. त्यांनी सुद्धा जे योग्य आहे ते बोलून दाखविले पाहिजे. त्याच प्रमाणे महाराष्ट्रात जी स्थिती समोर येते ते भयाण आहे. काँग्रेस सोडून जाणाऱ्यांची संख्या अधिक आहे. वरचेवर भाजपामध्ये जात आहेत तसेच राष्ट्रवादीत प्रवेश घेत आहेत. आता तर मनसे राज ठाकरे यांनी काँग्रेसला सोबत घेणार नाही. असे जाहीर म्हणणे धाडसाने म्हटने आहे. एककाळ असा होता की, काँग्रेस सोबत जाण्यासाठी दिसून येत होती. आता काँग्रेस सोबत नको म्हणण्याची वेळ येत असेल तर काँग्रेसने विचार केला पाहिजे. राज्यात आगामी काळात महानगरपालिकेची निवडणुक होणार आहे. त्या अगोदर नगरपालिकेच्या निवडणुकीचा निकाल जाहिर होणार आहे. यात जर काँग्रेसचे अध्यक्ष किंवा नगरसेवक निवडून आले तर समाधान वाटेल नसता पुन्हा अपयश आले तर आगामी महानगरपालिकेच्या निवडणुकीत अधिक जोर मारावा लागणार आहे हे निश्चित! राजकारणात कधी काय होईल हे सांगता येत नाही. दोन खासदार लोकसभेत भाजपाचे सुरवातीस आला पुर्ण देशच भाजपामय दिसून येत आहे. एक काळ काँग्रेसची सत्ता अनेक राज्यात होती. आज दैयनिय आवस्था काँग्रेसची दिसून येते. हा राजकारणात फरक दिसुन येतो. त्यामुळे कधी कोणाचे भाग्य उजाळेल हे सांगता येत नसते. त्यामुळे जिद्द ही सर्वात महत्त्वाची आहे. भाजपाकडे अनेकजन आकर्षिले जात आहेत. यापुढेही जातील, कारण कोणीही बुडणाऱ्या जहाजेत बसण्याची शक्यता नसते. चालत्या राजकारणात उडी घेणारे कमी नाहीत. भाजपाची सत्ता केंद्रात व राज्यात आहे. त्यामुळे भाजपाकडे आकर्षिले जाणे स्वाभाविक आहे. काँग्रेसने आपली नीती सुधारली नाही तर मोठे नुकसानीची शक्यता आहे. त्यामुळे काँग्रेसने कार्यकर्ते जपले पाहिजेत. सुख-दुःखात सामील झाले पाहिजे. काँग्रेसच्या जीवावर मोठे झालेल्यांनी घरात न राहाता जनतेत मिसळले पाहिजेत. तरच काँग्रेसचे असित्व टिकणार असेच सध्याच्या राजकारणावरुन दिसून येत आहे. राजकारण हे स्थिर नसते बदलते असते. त्यानुसार पक्षाची वाटचाल असली पाहिजे. भाजपा सतत पर्याय तयार ठेवत असतो. त्यांच्यावर नजर ठेवणारी तिसरी शक्ती आहे. ते वारंवार मार्गदर्शन करीत असते. त्याच्यापुढे कोणालाही जाता येत नाही. मुळात शिस्तबद्ध पक्ष म्हणून पाहिला जातो तो एकमेव भाजपा आहे. त्याचेकडील चांगले गुण इतराने घेणे अपेक्षित आहे. काही जन टिका करीत असतात. टिका करणे सोपे मात्र एखाद्याकडून चांगले गुण घेणे आवघड असते. ज्यांना राजकारण बरोबर देशहीत समजले ते पुढे गेलेले आहेत. ठराविक अपयश येणाऱ्या बाबीची चर्चा दरवेळी करणे योग्य नाही. किती टिका करणारा, तेच-ते मुद्दे सतत चघळणे योग्य नाहीत. व्यक्ती टिका करणे हे अपयशाचे कारण आहे. त्यामुळे वस्तूस्थिती दर्शक त्याच बरोबर जनतेचा पाठींबा देणाऱ्या टिका, चुका शोधणे आवश्यक आहे. बिनबुडाचे आरोप काही उपयोगाचे नसतात हे सतत लक्षात ठेवले पाहिजे.

# कर्मयोगी गाडगे महाराज



महाराष्ट्राच्या जडणघडणीत संतांच्या कार्याचा फार मोठा वाटा असुन त्यांनी आपल्या अभंग साहित्यातुन समतेच्या विचारांची पेरणी केली. ज्या ज्या सुधारणावादी चळवळी महाराष्ट्रात निर्माण झाल्या त्यांच्या मुळाशी संतांच्या विचारांचा ओलावा आहे. जेव्हा प्रबोधनाची आणि लोकजागृतीची कोणतीही साधने उपलब्ध नव्हती तेव्हा गावागावात संतांचे विचार पोहचविण्याचे काम कीर्तनकारांनी केले. नामदेव महाराजांनी ''नाचू कीर्तनाचे रंगी, ज्ञानदीप लावू जगी'' असे जे म्हटले होते त्यांचा वसा आणि वारसा चालवून समाजाला जागृत करण्याचे काम अनेक कीर्तनकारांनी केले. त्यामध्येच संत गाडगे महाराजांचा उल्लेख करावा लागेल.

अमरावती जिल्ह्यात शेणगाव या ठिकाणी गाडगे महाराजांचा जन्म २३ फेब्रुवारी १८७६ रोजी झाला. त्यांचे लहानपणीचे नाव डेबुजी झिंगराजी जानोरकर. त्यांच्यावर संत तुकाराम, संत कबीर यांचा विशेष प्रभाव होता. महाराजांचा वेश हातात एक काठी, डोक्यावर फुटके मडक्याचे खापर, एका कानात कवडी तर दुसऱ्या कानात काचेच्या बांगडीचा तुकडा, अंगावर अनेक चिंध्या जमा करून त्याचा शिवलेला सदरा. अशा अवतारामुळे त्यांना कोणी गाडगे महाराज, गाडगेबाबा, गोधडे बुवा म्हणत. गाडगे महाराज निरक्षर परंतु ''जे का रंजले गांजले'' त्यासी आपले म्हणणारे. अनुभव आणि निरीक्षणाच्या आधारे त्यांनी येथील अज्ञान, दारिद्र्य, अंधश्रद्धा, अस्पृश्यता आणि अनारोग्याच्या अंधारात खितपत पडलेल्या असंख्य गोरगरीब जनतेला ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्काराच्या वाटा दाखवल्या. कीर्तनाच्या माध्यमातून लोकांच्या जाणिवा जागृत केल्या. दिवसा खराट्याने गाव झाडून स्वच्छ करायचा आणि रात्री कीर्तनाद्वारे लोकांच्या डोक्यातील अज्ञानरूपी घाण नाहीशी करायची हा सेवा धर्म त्यांनी अंगीकारला. गाडगे महाराज त्यांचे विचार अगदी सहज सोप्या भाषेत समजावून सांगायचे. देवळात देव नाही, जात-पात मानू नका, सावकाराचे कर्ज काढू नका, लग्नकार्यात वायफळ खर्च करू नका, मुक्या जनावरांचा बळी देऊ नका, नवस, सत्यनारायण, जादूटोणा, देवभगत यांच्या नादी लागू नका. आपल्या लेकराला शाळेत घाला. शिक्षणासाठी पैसे नाहीत म्हणू नका. वेळप्रसंगी जेवणाचे ताट मोडा, हातावर घेवून भाकर खा पण लेकरांना शिक्षण द्या. सार्वजनिक स्वच्छता हा गाडगे महाराजांच्या कार्याचा केंद्रबिंदू होता. श्रमप्रतिष्ठा आणि वैज्ञानिक दृष्टिकोन समाजात रुजवण्यासाठी त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य जनता जनार्दनाच्या आणि दरिद्री नारायणाच्या सेवेत घालविले. अस्पृश्यता त्यांनी नाकारली. ते म्हणायचे सर्वांचे धरती, आकाश, नदी एक, सर्वांना दोन हात, दोन पाय सारखे असताना अस्पृश्यता आणि जातपात मानायचे काय कारण. स्त्री आणि पुरूष या दोन जाती आणि मानवता हा धर्म ते मानायचे. दगडातला देव त्यांनी नाकारला. भुकेल्यांना अन्न, तहानलेल्यांना पाणी, उघडया-नागडयांना वस्त्र, बेघरांना आसरा, बेकारांना काम, दुःखी व निराशांना हिंमत, गरीब मुला-मुलींना शिक्षण, गरीब तरूण-तरूणींचे लग्न, अंध-पंगु रोग्यांना औषध, पशु-पक्षी मुक्या प्राण्यांना अभय हाच रोकडा धर्म आणि हिच देवपुजा ते मानायचे. मी कोणाचा गुरू नाही व माझा कोणी शिष्य नाही असे म्हणुन गुरूशिष्य परंपरा त्यांनी नाकारली. ते केवळ बोलघेवढे संत नव्हते. त्यांच्या आचार आणि विचारात एक वाक्यता होती. त्यांनी निस्पृह आचरण आणि स्थितप्रज्ञ भाव ठेवून शेकडो लोकोपयोगी संस्था स्थापन केल्या. त्यामुळे ते खरे कृतिशील संत आणि समाजसुधारक होते. कुठल्याही संस्थेत माझा किंवा माझ्या नातेवाईकाचा सुतळीच्या तोड्यावर ही अधिकार नाही. कोणी अधिकार सांगत असेल तर त्याला हाकलून लावा. असा निस्पृह भाव ठेवून विश्वस्ताचा सिद्धांत त्यांनी प्रत्यक्षात आणला. प्रेम, करुणा, सेवा याचा अंगीकार करून, प्रत्येक माणूस हेच एक परमेश्वराचे देऊळ असून माणसाची सेवा हीच ईश्वराची पूजा आहे असा त्यांचा भाव होता. त्यांनी त्यांच्या कीर्तनाच्या माध्यमातून लोकजीवनाला अनौपचारिक शिक्षणाची शाळा केली होती. म्हणून ते एक चालते बोलते लोकविद्यापीठ होते. औपचारिकपणे 'कीर्तनात गोपाला गोपाला देवकीनंदन गोपाला' हे भजन म्हणायचे परंतु लोकशिक्षण हा कीर्तनाचा मुख्य उद्देश आणि सशक्त व बलशाली भारत हे ध्येय होते. त्यांचे जीवन म्हणजे लोक विकासाची चळवळ झाली. त्यांच्या कार्याचा आदर्श घेवून अनेक निस्वार्थी कीर्तनकार व अनेक धर्मशाळेत काम करणारे सेवेकरी तयार झाले. कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी, डॉ. पंजाबराव देशमुख, मुख्यमंत्री बाळासाहेब खेर, आचार्य अत्रे, प्रबोधनकार ठाकरे या सर्वांसोबत 'एकमेका सहाय्य करू' या न्यायाने ते अखंड न थकता कर्मयोगी म्हणून जगले. दारूबंदी प्रचार कार्यासाठी शासनाने त्यांना एक मोटारगाडी दिली होती. 'संत गाडगे महाराज स्वच्छता अभियान' या नावाने पुरस्कार देवून तसेच अमरावती विद्यापीठास 'संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ' असे नाव देवून त्यांच्या कार्याचा गौरव शासनाकडून करण्यात आला. त्यांचे देहावसान २० डिसेंबर १९५६ रोजी झाले. त्यांच्या कार्यास विनम्र अभिवादन.



**जगन्नाथ विठ्ठलराव कदम**
**संशोधक विद्यार्थी**
**महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर.**
**९४२०८८१०१२**

## गोल्डक्रेस्ट हाय स्कूल, लातूर यांच्या वतीने आयोजित 'संगीत रजनी' कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद

लातूर : गोल्डक्रेस्ट हाय स्कूल, लातूर यांच्या वतीने आयोजित ओपन-एअर म्युझिकल व आर्ट कॉर्नर प्रदर्शन कार्यक्रमास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. हा भव्य कार्यक्रम मंगळवार, १६ डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळी ६.०० वाजता क्रीडा संकुल, लातूर येथे मोठ्या उत्साहात पार पडला. कार्यक्रमाची सुरुवात विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या मंगलमय गणेश वंदनेने झाली. मान्यवरांच्या उपस्थितीत दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचा औपचारिक शुभारंभ करण्यात आला. त्यानंतर विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या 'आरंभ है प्रचंड', 'एक जिंदगी', 'अलबेला साजन', 'सौ तरह के', 'कंधो से मिलते है कंधे', 'मेरे ढोलना', 'चले छैया छैया', 'बॉलीवूड मॅशअप', 'तेरे लिए' आणि 'बुलेया' या गीतांवर आधारित गायन, वादन व नृत्य सादरीकरणांनी प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले.

इयत्ता सहावी ते नववीतील विद्यार्थ्यांसह शिक्षकांनीही विविध सादरीकरणांत उत्स्फूर्त सहभाग घेतला. विशेष आकर्षण ठरलेले ऑर्केस्ट्रा सादरीकरण तसेच शिक्षक-विद्यार्थ्यांचे संयुक्त सादरीकरण यांना प्रेक्षकांकडून प्रचंड टाळ्यांचा कडकडाट मिळाला. कार्यक्रमस्थळी विद्यार्थ्यांनी साकारलेले आर्ट कॉर्नर प्रदर्शन हे त्यांच्या कल्पकतेचे व सर्जनशीलतेचे उत्कृष्ट उदाहरण ठरले. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांनी एकत्रित सादर केलेले 'हम साथ चले तो' हे समूहगीत भावस्पर्शी ठरले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली. संपूर्ण कार्यक्रम शिस्तबद्ध, नियोजनबद्ध व अत्यंत दर्जेदार पद्धतीने पार पडला.

या कार्यक्रमातून गोल्डक्रेस्ट हाय स्कूलचा सर्वांगीण विकास, कला, संस्कृती व शैक्षणिक गुणवत्तेचा सुंदर संगम प्रेक्षकांसमोर सादर झाला.

## राष्ट्रहितासाठी ऊर्जा संवर्धनात सर्वांचा सहभाग आवश्यक – दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी

### दयानंद शिक्षण संस्थेत राष्ट्रीय ऊर्जा संवर्धन पुरस्काराचा गौरव सोहळा



**लातूर/प्रतिनिधी :** येथील दयानंद एज्युकेशन सोसायटीला १४ डिसेंबर २०२५ रोजी ऊर्जा कार्यक्षमता ब्युरो,भारत सरकार ऊर्जा मंत्रालयातर्फे ऊर्जा कार्यक्षमतेत अनुकरणीय उत्कृष्ट कामगिरीसाठी विद्यापीठ व महाविद्यालय श्रेणीमध्ये राष्ट्रीय ऊर्जा संवर्धन पुरस्कार प्राप्त झाला.हा पुरस्कार दयानंद शिक्षण संस्थेतर्फे भारताच्या महामहीम राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेल्या विज्ञान भवन दिल्ली येथे संस्थेचे एडिओ व नोडल अधिकारी डॉ.जयप्रकाश दरगड व दयानंद वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.प्रशांत मान्नीकर यांनी स्वीकारला.सदरील राष्ट्रीय ऊर्जा संवर्धन पुरस्कार-२०२५ हा पुरस्कार दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी,उपाध्यक्ष ललितभाई शाह,रमेशकुमार राठी,सचिव रमेश बियाणी,कोषाध्यक्ष संजय बोरा,संयुक्त सचिव विशाल लाहोटी,ॲड.माधव इंगळे, उमाकांत केराळे,हरी किशन मालू,मेहुल राठोड,शशिकांत कोटलवार,सागर मंत्री व नियामक मंडळाचे सर्व पदाधिकारी आणि सदस्य यांच्या प्रमुख उपस्थितीत नोडल अधिकारी डॉ.जयप्रकाश दरगड व सर्व महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी सुपूर्त केला तसेच दयानंद शिक्षण संस्थेतर्फे ऊर्जा संवर्धन पुरस्कार मिळविण्यात महत्त्वाची भूमिका बजावलेले नोडल अधिकारी डॉ.जयप्रकाश दरगड यांच्यासहित संस्था संलग्नित सर्वंच महाविद्यालयाचे प्राचार्य व संबंधित महाविद्यालयाचे ऊर्जा संवर्धन समन्वयक, प्रस्ताव तयार करणारे डॉ.कोमल गोमारे व प्रा.स्वरूप गावकरे यांचा यथोचित सन्मान करण्यात आला.

याप्रसंगी दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी असे म्हणाले की,दयानंद शिक्षण संस्थेला राष्ट्रीय पातळीवरचा ऊर्जा संवर्धन -२०२२ आणि दुसऱ्यांदा २०२५ मध्ये संस्थेसाठी पुरस्कार मिळाला ही संस्थेसाठी आणि समस्त लातूरकरांसाठी अभिमानाची बाब असून दयानंद शिक्षण संस्था ही केवळ शैक्षणिक क्षेत्रातच नव्हे तर राष्ट्र व समाजोपयोगी कार्यात नेहमी सक्रिय सहभागी राहील.ऊर्जा संवर्धनासंदर्भात जनजागृती होणे ही आधुनिक काळाची खरी गरज आहे व राष्ट्रहितासाठी सर्वांनी ऊर्जा बचतीसाठी कृतीने सहभाग घेऊन पुढाकार घ्यावा असे ते म्हणाले.

संस्थेचे सचिव रमेश बियाणी असे म्हणाले की,दयानंद शिक्षण संस्थेची नवनवीन संकल्पना घेऊन आज यशस्वी वाटचाल सुरू असून बदलत्या काळाबरोबर ऊर्जा संवर्धन,हवेची गुणवत्ता तपासणे, वृक्षारोपण,जल पुनर्भरण,चांगले स्वच्छ आणि सुंदर लातूर यासाठी संस्था नेहमीच अग्रेसर राहील.सर्वांनी टीमवर्कने स्मार्ट कार्य करून आपण स्वयंपूर्ण होऊया.संस्थेत जवळपास पंधरा हजार विद्यार्थी शिक्षण घेत असून त्यांचे उज्ज्वल भविष्य घडविण्याबरोबर समाज व राष्ट्र उपयोगी कार्यात आपण हातभार लावूया असेही ते म्हणाले.

प्रास्ताविकातून नोडल अधिकारी डॉ. जयप्रकाश दरगड यांनी ऊर्जा संवर्धन पुरस्काराची पार्श्वभूमी सांगत असताना दयानंद शिक्षण संस्थेनी ऊर्जा संवर्धनासाठी दयानंद शिक्षण संस्थेच्या सर्वंच महाविद्यालयात व परिसरात केलेली रचना, सोलार सिस्टिम,राबविलेले विविध उपक्रम व अथक परिश्रमातून तयार केलेला प्रस्ताव, एनर्जी ऑडिटर केदार खमितकर व किरण खमितकर यांचे मिळालेले सहकार्य व ऊर्जा संवर्धनाचे उत्तम नियोजन याबद्दलही सविस्तर माहिती सांगितली तर आभार प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर यांनी मानले.

सूत्रसंचालन डॉ.कोमल गोमारे यांनी केले.याप्रसंगी दयानंद शिक्षण संस्था अंतर्गत असलेल्या सर्वंच महाविद्यालयाचे प्राचार्य, उपप्राचार्य, पर्यवेक्षक,ऊर्जा समन्वयक,प्राध्यापक शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते.

## शारंगधर बालाजी मंदिर...मेहकर

**तुझे आहे तुजपाशी**
**परि जागा तू चुकलासी**

बऱ्याचदा असं होतं की आपल्याला हवी असलेली गोष्ट आपल्या जवळपासचं असते पण त्यासाठी आपण सगळ्या जगाला वेढा मारून येतो...मी इतके वर्षे झाले तिरुपती बालाजीला सलग दरवर्षी जातो आणि त्याचं श्री बालाजीचे एक नितांत सुंदर, अफाट,अद्वितीय असे मंदिर आपल्याचं महाराष्ट्रात अगदी हाकेच्या अंतरावर आहे...

**मेहकरचे श्री शारंगधर बालाजी मंदिर...**

आपल्या महाराष्ट्रात औरंगाबाद पासून १५० किमी आणि शेगांव पासून केवळ ९० किमी अंतरावर इतकं सुंदर आणि अदभुत मंदिर आहे यावर विश्वास बसत नाही...तुम्ही शेगांवला जाणार असालं तर जरा वाट वेगळी करून येथे अवश्य भेट द्या...काहीतरी उत्तुंग आणि उत्कृष्ट बघायला मिळाले याची अनुभूती येईल...

प्राणहिता किंवा पैनगंगा या नदीच्या काठी हे मंदिर आहे... विदर्भाची गंगा संबोधली जाणाऱ्या या नदीचे वैशिष्ट्य म्हणजे ही नदी उलटी म्हणजे दक्षिणेतुन उत्तरेकडे वहाते...( या शहराला लागूनच असलेल्या लोणार सरोवराच्या जंगलात श्रीराम वनवासात वास्तव्यास असताना त्यांनी यांच नदीच्याकाठी वडिलांचा दशक्रिया विधी केला असं म्हणतात...याचं लोणार जंगलात श्रीराम यांनी पिंडदान केले आणि तिथे जंगलात श्रीरामाचे एक खास वैशिष्ट्यपूर्ण मंदिरही आहे, त्यावर एक स्वतंत्र लेख आहे जो जरूर वाचा...)

आज मेहकरमध्ये ज्या ठिकाणी हे श्री बालाजी मंदिर आहे त्याठिकाणी १८८८ मध्ये एका गढीचे बांधकाम करताना एकूण पाच मुर्त्या जमिनीत पुरलेल्या सापडल्या...त्याकाळी मुघलांच्या आक्रमणापासून या मूर्ती वाचवण्यासाठी लोकांनी असे केले असे समजते... जमिनीत चंदनाच्या भूशात पंधरा फूट लांबीच्या पेटीत या मुर्त्या पुरून ठेवल्या होत्या...या पाच पैकी एक अतिशय सुंदर आणि सुबक मूर्ती श्री बालाजी यांची आहे... पुढे इंग्रजांची नजर या मूर्तीवर पडली आणि त्यांनी ही मूर्ती लंडनला न्यायचा घाट घातला... त्यांचा हा मनुसुबा स्थानिक गावकऱ्यांना समजल्यावर त्यांनी तातडीने मंदिराचे बांधकाम सुरू केले आणि कमीतकमी वेळात हे मंदिर बांधून या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा केली...त्यामुळे हा अफाट श्रीमंत ठेवा आपल्याकडे शाबूत राहिला, नाहीतर इतकी गोड आणि प्रसन्न मूर्ती इंग्लंडमध्ये म्युझियम नावाच्या कैदेत काचेच्या पेटीत बंदिस्त झाली असती...मूर्ती वाचली पण तरीही या मूर्ती बरोबर एक ताम्रपट होता तो मात्र इंग्रजांनी आपल्या बरोबर लंडनला नेलाचं...ही श्री बालाजी मूर्ती वाचवण्यासाठी त्याकाळी ज्या गावकऱ्यांनी मदत केली, प्रयत्न केले त्या सगळ्यांना इंग्रजांनी नंतर कैदेत टाकले आणि त्यांचा अतोनात छळ केला...त्या लोकांचे आपण कायम ऋणी असायला हवं...

या मूर्तीचे खूप सारे वैशिष्ट्य आहेत...ही मूर्ती अकरा फूट पाच इंच उंचीची असून चार फूट रुंद व दोन फूट जाडीची आहे... संपूर्ण जगात इतकी उंच असलेली ही एकमेव मूर्ती आहे...तिरुपती बालाजी पेक्षाही या मूर्तीची उंची जास्त आहे...

या मूर्तीचे एक खास वैशिष्ट्य म्हणजे या मूर्ती सोबत श्री लक्ष्म देवीची मूर्ती आहे...संपूर्ण जगात श्रीलक्ष्मी आणि श्रीबालाजी अशी एकत्रित मूर्ती दुसरीकडे कोठेही नाही...आणि याचंमुळे हे मंदिर खऱ्या अर्थाने लक्ष्मी नारायण मंदिर संबोधले जाते...श्री लक्ष्मी देवींची नजर श्री बालाजी यांच्या चरणाकडे आहे...याचं मूर्तीच्या दुसऱ्या तळपायाशी श्रींची दुसरी पत्नी श्री भुदेवीची मूर्ती पण आहे...मूर्तीच्या दोन्ही बाजूला जय- विजय या रक्षकांची मूर्ती आहे...या सगळ्या मुर्त्या अगदी सुबक, नाजूक आणि अगदी कोरीवकाम केलेल्या आहेत...

श्री बालाजींच्या शिर्षभागी शारंगधर रुपात श्रींचे रूप असल्याने या मूर्तीला शारंगधर बालाजी असे म्हणतात... शारंग नावाचे एक धनुष्यबाण होते ज्याने त्यांनी मेघनकर नावाच्या राक्षसाचा वध केला होता...यांच कारणाने या गावाला मेहकर असे नावं पडले...या मूर्तीच्या दोन्ही बाजूला विष्णूचे दशावतार कोरलेले असून मूर्तीच्या मस्तकी भागाच्या प्रभावळीत ब्रम्हा विष्णू महेश यांचे दर्शन होते... त्यामुळे या मूर्तीला बालाजीचे त्रिविक्रम रूप असेही म्हणतात...

केवळ एका उभ्या काळ्या पाषाणापासून बनवलेली ही भरीव मूर्ती इतकी आखीवरेखीव आहे आणि कोरीवकाम इतके सूक्ष्म आहे की श्री बालाजी यांची बारीक नखे, अगदी तळहातावरच्या भाग्यरेषाही अगदी सुस्पष्टपणे दिसतात...

मूर्ती अगदी प्रसन्न, निरागस, आणि हास्यवदन असून मूर्तीकडे बघताच एक आनंदी भाव आपल्या चेहऱ्यावर उमटतो...या मूर्तीचे एक वैशिष्ट्य असे की तुम्ही ज्या नजरेने त्या मूर्तीकडे बघाल ते भाव त्या मूर्तीच्या चेहऱ्यावर दिसतात... तुम्ही हसून बघाल तर मूर्ती तुमच्याकडे हास्यवदनाने बघतेय असे दिसेल, तुम्ही दुःखी मनाने बघाल तर मूर्तीच्या चेहऱ्यावर करुण भाव उमटताना दिसतील... म्हणून या मूर्तीला आत्मरूप दर्शन असेही म्हणतात... प्रातःकाळी ही मूर्ती बाल रुपात, सकाळी तारुण्यरुपात आणि मध्यानकाळी वृध्द रुपात दिसते...त्या मूर्तीकडे पाहिले की आपली दृष्टी खिळून जाते आणि अखंडपणे त्या मूर्तीकडे बघतचं रहावं असे वाटते इतकी ही मूर्ती आनंदी आणि प्रसन्न आहे...

मंदिराचे स्थापत्यही अलौकिक असेच आहे...भल्या मोठ्या सभामंडपात आरामात बसून तुम्ही सहजी दर्शन घेत नामस्मरण करू शकता...

याच मंदिराच्या मागच्या बाजूला श्री गणेश, श्री दुर्गा, श्री हनुमान यांची मंदिरे आहेत...या मूर्ती बरोबर सापडलेली श्री केशवराज यांची काळ्या पाषाणातील मूर्ती अवश्य बघा...हे केशवराज म्हणजे श्री बालाजी यांचे मोठे बंधू...मागच्या बाजूला ते मंदिर आहे...

अरे हो अजून एक वैशिष्ट्य सांगायचे राहिले...ते वैशिष्ट्य असे श्री बालाजी यांच्या हातातील शंख, चक्र, गदा, पद्म हा क्रम वेगळा आहे...श्री विष्णू रूपातील मूर्तीत उजव्या खालच्या हातात गदा, मग उजव्या वरच्या हातात चक्र आणि डाव्या वरच्या हातात शंख असतो, जे सहसा सर्वच मूर्ती मध्ये आढळतो पण या ठिकाणी श्री बालाजी मूर्ती मध्ये हा क्रम वेगळा आहे...श्री बालाजी यांच्या डाव्या खालच्या हातात शंख, डाव्या वरच्या हातात चक्र आणि उजव्या वरच्या हातात गदा आहे...माझ्या माहितीनुसार या प्रकारच्या मूर्तीला श्री विष्णूचे प्रद्युम्न मूर्तीरूप असे म्हणतात...

यांच मंदिराच्या समोर श्री बालाजी यांचे वाहन गरुडाचे मंदिर आहे, सध्या ते मोडकळीस आले असून त्यातली गरुडाची मूर्ती काढून आता मुख्य मंदिरात आणून ठेवली आहे...या गरुड मंदिराची एक खास बाब अशी या मंदिरातून जे प्रतिबिंब दिसायचे त्यात श्री बालाजी हे गरुडावर आरूढ झालेले आहेत याची प्रचिती यायची...

या बालाजी मंदिराच्या समोर जरा खालच्या बाजूला जवळपास शंभर वर्षे जुने माहुरच्या रेणुका मातेचे मंदिर आहे...जरासे भूगर्भात असलेल्या मंदिराला जरूर भेट द्या...

अगदी आवर्जून वेळ काढून भेट देण्यासारखे हे ठिकाण आहे...मेहकर पासून वीस किमी अंतरावर जगप्रसिद्ध लोणार सरोवर आहे...हा एक अचंबित करणारा प्रकार आहे...शेगांव-लोणारसरोवर आणि मेहकर श्री बालाजी दर्शन अशी दोन तीन दिवसाची कौटुंबिक सहल अवश्य होऊ शकते...मोठे ही खुश होतील आणि लहानांना लोणार सरोवर बघून नक्कीच आनंद होईल...मेहकर मध्येच श्री नृसिंहाचे तेराव्या शतकातील मंदिर आहे, तेथेही अवश्य भेट द्या...या मेहकरच्या आजूबाजूला काही किमी अंतरावर असलेले देऊळगाव राजा आणि वाशीम या शहरात देखील श्री बालाजी यांचे मंदिर आहे...असं म्हणतात की या तिन्ही बालाजींचे दर्शन घेतले की श्री तिरुपती बालाजी दर्शन घेतल्याचे पुण्य प्राप्त होते...

आपल्या पूर्वजांनी आपल्यासाठी सोडलेला हा इतिहास, हा वारसा, हे दुर्मिळ वैभव, ही हिंदू संस्कृती आपण जपली पाहिजे, त्याचा प्रचार प्रसार केला पाहिजे जेणेकरून आपल्या पुढच्या पिढीला हे बघायला, अनुभवायला मिळेल...

# येळवस : उत्सव आहे शेतीचा



डिसेंबर आणि जानेवारीचे महिने म्हणजे शेत शिवारात खानपानाच्या मेजवानीचे दिवस असतात. याच दिवसांत ङ्गयेळवसफ हा शेतीसंस्कृतीमधील महत्त्वपूर्ण सण येतो. या सणाची लोक आतुरतेने वाट पाहतात. कित्येक महिने आधी या सणाला एकत्र जमण्याचे नियोजन करतात. नांदेड, लातूर, उस्मानाबाद, हिंगोली, परभणी या भागातील, पुणे, मुंबई व इतरत्र नोकरी व शिक्षणासाठी असलेले सर्वजण झाडून येळवस या सणाला आपल्या गावी परततात. ......
डिसेंबरच्या गुलाबी थंडी बरोबरच शिवारात येरोन्या, बोरं, बिब्बे, चिंचा हा रानमेवा आलेला असतो. तुरीच्या शेंगा भरू लागतात. याच दिवसात संध्याकाळी शेता शेताच्या बांधावरून धूर निघत असल्याचं दिसत राहतं. हा धूर काही शेकोटी केल्याचा नसतो. हा धूर असतो तो तुरीच्या शेंगा भाजत असल्याचं. छोट्याशा मडक्यामध्ये तुरीच्या शेंगा गच्च भरून त्याच्या तोंडाशी पळसाची पाने लववून बंद केलं जातं. मग हे मडके पालथे ठेवून त्यावर जाळ केला जातो. पाच दहा मिनिटात या मडक्यातील शेंगा मस्त उकडून निघतात. काहीजण याच तुरीच्या शेंगात दोन चार हिरव्या मिरच्या टाकतात.
शिजलेल्या शेंगासोबत अधूनमधून मिरची तोंडी लावत शिवारा शिवारात लोकांच्या गप्पा सुरू असतात. या दिवसात गावातील मित्र मंडळी जमून एकत्र असं तुरीच्या शेंगा खाण्याचा कार्यक्रम करतात. डिसेंबर आणि जानेवारीचे महिने म्हणजे शेत शिवारात खानपानाच्या मेजवानीचे दिवस असतात. याच दिवसांत ङ्गयेळवसफ हा शेतीसंस्कृतीमधील महत्त्वपूर्ण सण येतो. या सणाची लोक आतुरतेने वाट पाहतात. कित्येक महिने आधी या सणाला एकत्र जमण्याचे नियोजन करतात. नांदेड, लातूर, उस्मानाबाद, हिंगोली, परभणी या भागातील, पुणे, मुंबई व इतरत्र नोकरी व शिक्षणासाठी असलेले सर्वजण झाडून येळवस या सणाला आपल्या गावी परततात.
येळवस हा शेतीचा उत्सव, शेतीमधील आलेल्या नवीन पिकांचा आस्वाद घेण्याचा सन. मार्गशीर्ष महिन्याचा दर्शवेळा अमावास्येचा दिवस येळवस म्हणून साजरा केला जातो. साधारण हा सण डिसेंबरच्या दुसर्या किंवा जानेवारीच्या पहिल्या पंधरवड्यात येतो. यालाच गावाकडची लोकं वेळा अमावस्या, येळ अमावस्या किंवा येळवस असे म्हणतात. हा सण मराठवाडा भागातील कर्नाटक व तेलंगण सीमालगत असणार्या नांदेड, लातूर, उस्मानाबाद ह्या जिल्ह्यात उत्साहात साजरा केला जातो. याशिवाय परभणी, जालना, हिंगोलीच्या काही गावामध्येही काही प्रमाणात साजरा केला जातो.
डिसेंबर व जानेवारी महिन्यात या भागात ज्वारी, गहू, हरबरा, करडई, तूर ही सर्व रब्बीची पिकं शेतीत डोलत असतात. रानात येरोन्या, बोरं, बिब्बे, चिंचाही लागलेल्या असतात. या दिवसात तसे शेतीचे कामही खुपसे नसते. शेतकरी आपल्या शेतीतील उभ्या पिकाकडे बघून त्याचे लाड करीत असतो. डोलणार्या व भरलेल्या पिकामुळे त्याच्या चेहर्यावर उत्साह आलेला असतो. हा उत्साह साजरा करण्यासाठी यळवस या सणाला आपले जवळचे, लांबचे सर्व मित्र, नातेवाईक यांना तो आपल्या शेतीत आमंत्रित करतो.

येळवसाच्या जेवणाची तयारी

येळवस हा थंडीच्या दिवसात येणारा सण. घरातील लहानगे, वयस्क यांना जेवण दिल्यावर आदल्या दिवशी रात्री महिला या सकाळच्या स्वयंपाकाची तयारी करीत असतात. तुरीच्या शेंगा सोलून ठेवणे, हरभर्याच्या ढाळीतून दाणे काढून ठेवणे, कुठूनतरी मिळवलेली कच्ची चिंच असेल तर ती काढून ठेवणं, दुधी भोपळा, वांगी, वेगवेगळ्या प्रकारच्या वालाच्या शेंगा, कच्चे टमाटे या सगळ्या गोष्टी तयार करून ठेवणं. तीळ व शेंगदाणे भाजून घेणे, त्याची बारीक कुट करून ठेवणे. या सर्वांची तयारी करून साधारण बारा एक वाजता झोपलेल्या महिला परत सकाळी तीन चार वाजता उठून स्वयंपाकाला लागतात. हा सण म्हणजे त्यांच्यासाठी व सर्वांसाठीच लगीनघाईच असते. सर्व कार्यक्रमाप्रमाणे यामध्येही महिलांना जास्तीची कामे करावी लागतात.
बहुतेक सर्व स्वयंपाक चुलीवरचाच असतो. दिवाळीला बळीराजाचा जो वाडा बनवला जातो त्यासाठी मुख्यतः शेण वापरलेलं असतं. दुसर्या दिवशी हा वाडा मोडून त्याचे पाच शेणाचे गोळे केले जातात. त्यातीलच थोड्या शेणाची दोरी बनवून गुणाकारासारखे चिन्ह बनवून गोळ्यावर वरच्या बाजूला चिकटवले जाते. त्याची पूजा करून ते उन्हात वाळवले जातात. त्यांना ङ्गबोड्डेम्माफ असं म्हटलं जातं. येळवसचे जे जेवण बनवतात त्यात बोड्डेम्मांचा गौर्यासारखा जळणात वापर केला जातो. बळीराजाच्या वाड्यापासून बनविलेले बोड्डेम्मा, शेतीसंस्कृतीमधील महत्त्वपूर्ण येळवस सणाला जेवण बनविताना वापरतात. ही प्रथा का व कशी रूढ झाली असेल, याचा शोध घेणं आवश्यक आहे.

शेतीमधील येळवस पूजा

रब्बीच्या ज्वारी व हरभरा पिकात एके ठिकाणी एक छोटी खोप उभी केली जाते. खरीप पिकावेळी पेरलेली ज्वारीची किंवा आधीच्या वर्षीच्या ज्वारीच्या पाच पेंढीपासून ही खोप बनविलेली असते. त्या खोपेत चिखल करून शेतीच्या देवीचं घर बनवलं जातं. या देवीला काही भागात लक्ष्म्या म्हणतात. देवीच्या घरात जातं, उतरंड, उखळ, मुसळ, घर-संसारात लागणार्या वेगवेळ्या वस्तू, घराला राखणदार असं सर्व बनवलं जातं.
खोपीच्या पुढे थोड्या अंतरावर छोट्या मातीच्या भांड्यात दुधात तांदूळ शिजत ठेवतात. त्याला उत्तु याव व ते उत्तरेकडे जावं असा समज असतो. उत्तरेकडे उत्तु गेलं तर शेत चांगलं पिकेल. घरात सुख येईल, अशी लोकांची समजूत आहे. या दिवशी दूध उतू घालण्यासाठी जो विस्तव बनवलेला असतो तोच विस्तव जपून ठेवून पुढील दोन महिने त्यावर हुरडा भाजला जातो.खोपीत देवीची पूजा झाल्यावर एकजण द्रोणात पाणी व दुसरा आंबील घेतो. खोपीभोवती एकामागे एकजण फेरी करतात. पुढे असणारा पाणी तर मागे असणारा आंबील घेऊन ज्वारीच्या पानाने ते पिकावर शिंपडतात. पुढे असणारा ङ्गवलग्या वलग्याफ तर त्यामागील व्यक्ती ङ्गसालम पलग्याफ असे म्हणत दोन किंवा पाच फेर्या घालतात. त्यानंतर सगळे त्या खोपीशेजारी बसून जेवतात. या दिवशी शिवारभर सगळीकडून ङ्गवलग्या वलग्याफ्चे आवाज ऐकायला येतात. वलगे वलगे सालम पलगे, याचा अर्थ वांग्याची भाजी आणि पोळी तुम्हाला देतो. तुम्ही आम्हाला चांगली पिकं द्यावीत व आम्हाला समृद्ध करावं, असा काहीसा अर्थ होतो.


# तुम्हालाही व्यायामाची आवड आहे? तुमची हिच आवड सांगते स्वभाव



बऱ्याचदा लोकांना व्यायाम करा असं सांगावं लागतं. पण काही लोक असतात जे आपल्या फिटनेस विषयी फार जागरुक असतात. व्यायाम, जीम, योगासनं केल्याशिवाय त्यांना चैन पडत नाही. पण व्यायामातही प्रकार असतात आणि तुम्हाला नेमक्या कोणत्याप्रकारचा व्यायाम करायला आवडतो यावर तुमचा स्वभाव ओळखता येऊ शकतो. जाणून घेऊया. तुम्ही व्यायामाला फार महत्व देतात, रिकाम्या वेळेत जीमला जाणे पसंत करतात, तुम्ही एथलीट आहात का? असे असेल तर याचा अर्थ होतो की, तुमच्याकडे भरपूर शारीरिक आणि मानसिक उर्जा आहे. जी फिजीकल अॅक्टीव्हीद्वारा तुम्ही बाहेर काढतात. वॉलीबॉल, टेनिस, सॉकर, मार्शल आर्ट या पैकी कोणताही व्यायाम प्रकार करा एका अॅथलिटचा स्वभाव हा आक्रमक आणि गतीशील असतो. खाण्यापासून बूटांपर्यंतची आवड त स्वभाव सांगते द माइंड जर्नलमध्ये सांगितल्यानुसार फिटनेस फ्रीक किंवा खेळाडू लोकांच्या स्वभावाविषयी...
असे लोक फार कृतीशील असतात.हे लोक दृढ निश्चयी, आत्मविश्वासू आणि उर्जेने भरलेले असतात.हे लोक ध्येयवादी असतात. स्पष्टवक्ते असतात इतरांना सहज प्रेरीत आणि प्रभावीत करतात. आवडत्या रंगावरुन ओळखा माणसांचा स्वभाव हे लोक लक्ष्य ठरवून काम करतात.ते गाठण्यासाठी प्रचंड मेहनत घेतात.सकारात्मक वृत्तीचे असतात.

# सगळ्यात जीवघेणा असतो हा हार्ट अटॅक!

हार्ट अटॅक हा बहुदा कोणत्याही इतर आजारांपेक्षा फार भयानक आजार आहे. गेल्या काही वर्षांत हार्ट अटॅकचा प्रकार खूप वेगाने वाढतो आहे आणि आपल्या आरोग्यासाठी धोकादायक बनत चालला आहे. त्यामुळे अनेकांना आपला जीवही गमवावा लागतो आहे. हार्ट अटॅक हा सहसा आपल्या लाइफस्टाईल आणि अनुवांशिक कारणांमुळे होऊ शकतो. हार्ट अटॅक हा एकमेव आजार असा आहे ज्यात माणसाचे वाचण्याचे चान्सेस हे खूप कमी असतात आणि तेव्हा त्वरित वैद्यकीय मदतीची आवश्यकता असते. पण या सर्व हार्ट अटॅकपैकी सर्वात धोकादायक म्हणजे डढए-चख (डढ-िशसाशपीं शश्रशींरींळेप ्रूलरी-वळरश्र ळपषरील- ींळेप), ज्याला विडोमेकर- ींरलज्ञ) हार्ट अटॅक असेही म्हणतात.



# योग जीवन
## वीरासन वीरासन



दंडस्थितीमधील आसन आपण बघणार आहोत. वीर म्हणजेच योद्धा.असे करावे आसनप्रथम ताठ उभे राहावे. त्यानंतर डावा पाय पुढे घ्यावा. दोन्ही पावलांत साधारण अडीच ते तीन फूट किंवा उंचीनुसार कमी-जास्त अंतर घ्यावे. मागचा पाय आहे म्हणजेच इथे उजवा पाय. त्याचे पाऊल उजव्या दिशेला वळवावे.डावा पाय गुडघ्यात वाकवून गुडघा आणि घोटा साधारणपणे एक रेषेत असावे. डावी मांडी जमिनीला समांतर असावी. दोन्ही हातांचा नमस्कार करून हात वरच्या दिशेला घ्यावेत.दोन्ही दंड कानाला टेकलेले व कोपरात ताठ असावेत. नजर व मान वरच्या दिशेला असावी. श्वसन संथ सुरू ठेवावे. या आसनस्थितीमध्ये कमरेतून थोडे मागे वाकावे. मागच्या पायाचा गुडघा ताठ असावा. छायाचित्राप्रमाणे आसन करण्याचा प्रयत्न करावा. एक बाजूने कृती झाली की दुसऱ्या बाजूनेही आसन करावे. आसनाचे फायदे-या आसनाच्या नियमित सरावाने मांडी व संपूर्ण पायाचे स्नायू सुदृढ होतात. पायदुखी, पाठदुखी कमी होते. संपूर्ण शरीराचे रक्ताभिसरण सुधारते. गळा, छाती, पोट यांना उत्तम ताण बसल्याने तेथील कार्यक्षमता वाढते. थायरॉइड, मधुमेह, अस्थमा, पचनासंबंधी तक्रारी, श्वसनाचे त्रास कमी होण्यास मदत होते. फुफ्फुस आणि हृदयाची कार्यक्षमता वाढते.

हे

## डॉक्टर टीप्स

डाएटकट्टा । कमी खाण्यापेक्षा कमी वेळा खाल्ल्याने आजारांवर मात । डॉ. दीक्षित

### वैवाहिक जीवन सुधारण्यासाठी विशेष टिप्स



वैवाहिक जीवन आरोग्यासाठी चांगले मानले जाते. पण हे सुद्धा खूप आवश्यक आहे कि सहवासचा आनंद घेण्यासाठी योग्य मार्ग जाणून घेतला पाहिजे. या लेखात दिलेल्या सोप्या टिप्स चा वापर करून तुम्ही तुमचे सेक्स लाइफ मध्ये सुधार आणू शकता.१. सहवास कण्याआधी ओरल सेक्स करणे महत्वाचे आहे. ही क्रिया सेक्स मध्ये महत्वाची भूमिका बंजावते. या क्रियेमुळे तुम्ही सेक्स चा आनंद खूप चांगल्या प्रकारे घेऊ शकता. २. परुष असो किंव्हा स्त्री त्यांना या गोष्टीची माहिती हवी असली पाहिजे कि आपला पार्टनर खुश कशामुळे होतो. आणि ते सेक्स करताना कोणत्या क्रियेमुळे जास्त एन्जाँय करू शकतो.




## विनोद

**शिक्षक : गव्हाचे सगळ्यात जास्त उत्पादन कोठे होते?**

**विद्यार्थी : शेतात.**

## संदेश

Aik rikshaw ke peche likha tha k "SAWAN KA INTAZAR HAI"
Peche se aik truck aya or rikshaw ko oraa dia(hit kia) or us ke peche likha tha "AYA SAWAN JHOOM KE".

## सुविचार


**संधी या देवतेच्या डोक्यावर एकही केस नसतो.**
**- टेरेन्स**



**संस्कृत सुभाषित**

**अप्राप्तकालं वचनं बृहस्पतिरपि ब्रुवन्**
**लभते बुद्ध्यवज्ञानमवानं च भारत ।।**
(उद्योगपर्व, अध्याय ३९, ेक २ महाभारत)
**अर्थ -**

# मनोरंजक महाशब्दकोडे



### आडवे शब्द

१. मागाहून, मग
३. कथांमधील भला मोठा नाग
६. सापाची एक जात
९. तळे, धरण, विहीर इ.
११. एक मंगल वाद्य
१३. वागणूक
१४. परमेश्वर
१५. मोठा डेरेदार वृक्ष
१८. विल्हेवाट, निकाल (लावणे)
१९. अंगावरील बारीक केस
२२. कबूतर
२३. चंद्र, एक वनस्पती
२५. मुलगा-मुलगी
२८. अत्यंत धनाढ्य मनुष्य
३२. काळ्या तोंडाचा हुप्प्या
३३. करसेवेचा अपभ्रंश - सेवा
३४. रोग झालेला, आजारी
३५. सारखा
३६. सदोदित
३७. चिवचिवाट
३९. हुबेहुब प्रत बनवणारा
४१. मांडणी, सजावट
४२. शुष्कता
४३. धुणे
४७. धुसफूस
४९. धातूचा धागा
५०. बुजणारी
५१. तारीख
५२. पद्धतीप्रमाणे
५३अ. पाणी
५४. मांडी न घालता बसलेला
५५. नेहमी, वारंवार
५७. खाट, चौपाई
५८. युवराज
६०. सापाची एक जात
६१. आपला नसलेला
६३. बातमीदार
६५. घोडागाडी
६६. धमकी
६७. त्रास, वैताग, बडबड
६९. पाठविलेला
७१. रवाळ
७३. मूळ आधार
७४. तिथीप्रमाणे बदलत जाणारा चंद्राचा आकार
७६. डोळे
७८. हाताचा तळवा
७९. पाप
८०. एकावर एक रचलेल्या वस्तू (उदा. गोवऱ्या, पुस्तके)
८१. पादत्राण

### उभे शब्द

१. ठोंब्या माणूस, शंकराचे वाहन
२. दुलई
३. नष्ट
४. मृत
५. रमापती
६. जमीनदोस्त
७. तृण
८. द्रव्य, पैसा
१०. प्रेत (हिंदी)
१२. नूतन
१६. भारतीय चलन
१७. पाठवणी
२०. जमीनदार
२१. भूतकाळ
२३. सुविधा
२४. पाठीतील हाडांच्या माळेतील मणी
२६. पुरुष
२७. पाताळ
२९. न वापरलेला
३०. नसलेला
३१. श्रीरामाचे स्तोत्र
३२. गंध
३४. जाड पोळी
३७. तंबूची कापडी भिंत
३८. साखळी लावलेला दिवा
३९. बोटाच्या टोकावरील आवरण
४०. लक्षाचा आकडा
४२. तापापूर्वीचे शहारे
४४. वेल
४५. फार गार वा उष्ण नसलेले
४६. निर्लज्ज
४८. साठ मिनिटे
५०अ. ढग
५३. चापट, मऊ पदार्थाचा आघात
५४. पार्वती
५४अ. डुक्कर
५६. सुतळीच्या धाग्याचे कापड
५९. मदत
६०. संगीतातील एक राग
६१. झटकन
६२. मनोहरी, रम्य
६४. विरोध
६६. प्रत्येक, किंमत
६७. काळिमा, बट्टा
६८. डाक, पत्र
७०. श्वासाचा अवयव
७२. राक्षस
७५. लत्ताप्रहार
७७. जून्या जखमेची खूण

### आडवे उत्तर

१.नंतर ३.नामकरण ६.भुजंग ९.जलाशय ११.सनई १३.वर्तन १४.ईश १५.तरुवर १८.वासलात १९.लव २२.पारवा २३.सोम २५.तनयतनया २८.नवकोटनारायण ३२.वानर ३३.कार ३४.रोगी ३५.सम ३६.सदा ३७.कलकलाट ३९.नकलाकार ४१.रचना ४२.रखरख ४३.क्षालन ४७.तणतण ४९.तार ५०.लाजरी ५१.दिनांक ५२.रीतसर ५३अ. जल ५४.उकीडवा ५५.सतत ५७.पलंग ५८.राजकुमार ६०.मणेर ६१.परका ६३३. वार्ताहर ६५.टमटम ६६.दम ६७.कटकट ६९.रवाना ७१.कणीदार ७३.पाया ७४.कला ७६.नयन ७८.करतल ७९.पातक ८०.थप्पी ८१.वहाण

### उभे उत्तर

१.नंदीबैल २.रजई ३.नाश ४.मयत ५.रमावर ६.भुईसपाट ७.गवत ८.धन १०.लाश १२.नवा १६.रुपाया १७.रवानगी २०.वतनदार २१.गतकाल २३.सोय २४.मणका २६.नर २७.नरक २९.कोरा करकरीत ३०.नासका ३१.रामरक्षा ३२.वास ३४.रोट ३७.कनात ३८.लामणदिवा ३९.नख ४०.लाख ४२.रसकसणे ४४.लता ४५.नरम गरम ४६.निलाजरा ४८.तास ५०अ.जलज ५३.रपका ५४.उमा ५४अ.कीरवा ५६.तरट ५९.कुमक ६०.मरवा ६१.पटकन ६२.रमणीय ६४.हरकत ६६.दर ६७.कलंक ६८.टपाल ७०.नाक ७२.दानव ७५.लाथ ७७.व्रण




## थोडक्यात/ संक्षिप्त

### 'माझी बदनामी झाली...', सौरव गांगुलीने ठोकला ५० कोटीचा दावा, नेमका कशाने पेटला वाद?

मुंबई-टीम इंडियाचा माजी क्रिकेटपटू आणि बंगाल क्रिकेट असोसिएशनचा माजी अध्यक्ष सौरव गांगुलीने याने ५० कोटींच्या अब्रूनुकसानीचा दावा ठोकला आहे. उत्तम साहा यांच्याविरोधात गांगुलीने कोलकाता येथील लालबाजार येथे तक्रार दाखल केली आहे. गांगुलीचा आरोप आहे की उत्तम साहा यांनी युवा भारती स्टेडियम (सॉल्ट लेक स्टेडियम) घटनेमध्ये जाणूनबुजून आपल्याला गोवले आहे. तसेच आपल्याविरोधात खोटी, द्वेषपूर्ण आणि बदनामीकारक विधाने करून प्रतिष्ठा खराब केली आहे. उत्तम साहा अर्जेंटिना फॅन क्लबचा अध्यक्ष आहे.दिग्गज फ ुटबॉलपटू लिओनेल मेस्सीच्या कार्यक्रमादरम्यान सॉल्ट लेक स्टेडियममध्ये गोंधळ उडाला होता. उत्तम साहा यांनी आपल्यावर वारंवार खोटे आरोप केले, ज्यामुळे माझ्या वैयक्तिक प्रतिष्ठेला धक्का बसला, तसेच सार्वजनिकरित्या चारित्र्य हनन झाले, असे गांगुली त्याच्या तक्रारीत म्हणाला आहे. उत्तम साहा यांनी जाणूनबुजून आणि हेतुपुरस्सर आरोप केले, असा दावाही गांगुलीने केला आहे. याप्रकरणी सौरव गांगुलीने साहा यांना कायदेशीर नोटीस पाठवली आहे तसंच ५० कोटींचा मानहानीचा दावाही दाखल केला आहे. उत्तम साहा यांच्या आरोपांना तथ्यात्मक आधार नाही, असंही गांगुली नोटीसमध्ये म्हणाला आहे.घटनेच्या दिवशी सौरव गांगुली सॉल्ट लेक स्टेडियममध्ये उपस्थित होता, पण तो गोंधळानंतर निराश होऊन निघून गेला. गांगुलीनी असेही स्पष्ट केले

### जगभरात नाचक्की झाल्यानंतर बीसी-सीआय चे संकटमोचक समोर आले... महिन्याभरासाठी घेतला मोठा निर्णय!

लखनऊ-भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातला लखनऊमधला चौथा टी-२० सामना दाट धुक्यामुळे रद्द करण्यात आला. सामना रद्द झाल्यानंतर लखनऊच्या अटल बिहारी वाजपेयी स्टेडियमवर जमलेल्या हजारो चाहत्यांची घोर निराशा झाली. तसंच बीसीसीआयवर वेळापत्रकाच्या नियोजनावरून टीकाही झाली. यानंतर आता बीसीसीआयने पहिली प्रतिक्रिया दिली आहे. बीसीसीआयने अप्रत्यक्षपणे आपली चूक मान्य केली आहे.माध्यमांशी बोलताना, बीसीसीआयचे उपाध्यक्ष राजीव शुक्ला म्हणाले की, भविष्यात ते उत्तर भारतातील हवामान लक्षात घेऊन साम न्यांचं आयोजन करण्याचा विचार करतील. लखनऊमधील टी-२० सामना रद्द झाल्यामुळे चाहते नाराज झाले आहेत, याची कबुली राजीव शुक्ला यांनी दिली आहे. बीसी-सीआय टीम इंडियाच्या सामन्यांच्या वेळापत्रकाचा आढावा घेईल. १५ डिसेंबर ते १५ जानेवारी दरम्यान होणारे सामने उत्तर भारताऐवजी पश्चिम भारतात होतील, असंही राजीव शुक्ला म्हणाले.डिसेंबर आणि जानेवारी महिन्यात उत्तर भारतात मोठ्या प्रमाणावर थंडी असते तसंच धुक्यामुळे दृश्यमानता कमी होते, यात प्रदूषण हादेखील एक प्रमुख घटक आहे.'धुक्यामुळे सामना रद्द करावा लागला. लोक खूप संतापले होते. १५ डिसेंबर ते १५ जानेवारी या कालावधीतील सामन्यांच्या वेळापत्रकाकडे आपल्याला लक्ष द्यावे लागेल. उत्तर भारताऐवजी पश्चिम भारतात सामने हलवण्याबाबत चर्चा होईल.

### 'आयपीएल'चे सुरूवातीचे सामने खेळणार नाही', ऑक्शनमध्ये ९.२ कोटी घेऊन शाहरुखला लावला चुना?

मुंबई-आयपीएल २०२६चा मिनी लिलाव नुकताच अबुधाबीमध्ये पार पडला आहे.या लिलावात अनेक युवा खेळाडू भाव खाऊन गेली तर काही स्टार खेळाडूंना खूपच कमी भाव मिळाला. अशात आता बॉलिवूड अभिनेता शाहरूख खानची फ्रेंचायजी असलेल्या कोलकत्ता नाईट रायडर्सच्या एका खेळाडूला ९.२ कोटीला खरेदी केली होते.इतकी मोठी रक्कम मिळाल्यानंतर या खेळाडूने शाहरुख खानला चुना लावला आहे. कारण या खेळाडूने आयपीएल २०२६ हंगामाचे सूरूवातीचे सामने खेळणार नाही, अशी माहिती दिली आहे. त्यामुळे शाहरूखला मोठा धक्का बसला आहे.खरं तर कोलकत्ता संघाने मिनी लिलावात बांग्लादेशच्या मुस्तफिजूर रहमानला ताफ्यात घेतलं होतं.मुस्तफिजूर रहमानला ९ कोटी २० लाखाच्या किंमतीत कोलकत्ता नाईट रायडर्सने संघात घेतलं आहे. ही डील झाल्यानंतर आता कोलकत्ता नाईट रायडर्सला मोठा धक्का बसला आहे. कारण मुस्तफिजूर रहमानने आयपीएलच्या पहिल्या आठवड्यात तो नॅशनल ड्यूटीवर असणार असल्याचे त्याने सांगितल्याची माहिती आहे. त्यामुळे तो आयपीएलचा सुरूवातीचा आठवडा नसणार आहे,अशी माहिती आहे.विशेष म्हणजे मुस्ताफिजूर प्रमाणे अनेक असे खेळाडू आहेत, ज्याची अशीच समस्या आहे,पण त्या खेळाडूंनी लिलावाआधीच त्यांच्या

# फायनलमध्ये इशानचं दमदार शतक

## झारखंडने सय्यद मुश्ताक अली ट्रॉफी जिंकून घडवला इतिहास



**नवी दिल्ली:** सय्यद मुश्ताक अली ट्रॉफी २०२५ स्पर्धेतील अंतिम सामना झारखंड आणि हरियाणा या दोन्ही संघांमध्ये पार पडला. या सामन्यात झारखंडने बाजी मारून इतिहास घडवला आहे.

### सय्यद मुश्ताक अली ट्रॉफी २०२५

सय्यद मुश्ताक अली ट्रॉफी २०२५ स्पर्धेतील अंतिम सामना हरियाणा आणि झारखंड या दोन्ही संघांमध्ये पार पडला. इशान किशनच्या नेतृत्वाखाली खेळणाऱ्या झारखंड संघाने अंतिम सामन्यात हरियाणाला पराभूत करून पहिल्यांदाच या स्पर्धेच्या जेतेपदाची ट्रॉफी उंचावण्याचा मान पटकावला आहे. इशान किशनच्या स्फोटक शतकी खेळीच्या बळावर झारखंड संघाने पहिल्या डावात २६२ धावांची विक्रमी धावसंख्या उभारली होती. या धावांचा पाठलाग करताना हरियाणाच्या फलंदाजांनीही कडवी झुंज दिली. पण हरियाणाचा डाव १८.३ षटकात १९३ धावांवर आटोपला.हरियाणाचा संघ पहिल्यांदाच सय्यद मुश्ताक अली ट्रॉफी स्पर्धेतील अंतिम सामना खेळण्यासाठी मैदानात उतरला होता. तर झारखंड संघाला देखील पहिल्यांदाच जेतेपदाची ट्रॉफी जिंकण्याची संधी होती. झारखंडच्या फलंदाजांनी या संधीचा दोन्ही हातांनी स्वीकार केला. पहिल्या डावात फलंदाजी करताना झारखंडच्या फलंदाजांनी हरियाणाच्या गोलंदाजांचा चांगलाच समाचार घेतला. अंतिम सामन्यात शतक झळकावणाऱ्या कर्णधार इशान किशनने या स्पर्धेत ५१७ धावा केल्या.यासह झारखंड संघाने पहिल्यांदाच या स्पर्धेच्या जेतेपदावर नाव कोरलं आहे. हे या स्पर्धेचे १८ वे हंगाम आहे. तामिळनाडू संघाने सर्वाधिक ३ वेळेस या स्पर्धेच्या जेतेपदावर नाव कोरलं आहे. तर मुंबई, कर्नाटक, वडोदरा, गुजरात या संघांनी २ वेळेस या स्पर्धेच्या जेतेपदाची ट्रॉफी उंचावली आहे. तर ईस्ट झोन, महाराष्ट्र, बंगाल, पंजाब, दिल्ली आणि झारखंड या संघांनी एक एक वेळेस या स्पर्धेच्या जेतेपदावर नाव कोरलं आहे.या सामन्यात हरियाणाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या झारखंडने २० षटकांअखेर ३ गडी बाद २६२ धावांचा डोंगर उभारला. झारखंडकडून खेळताना कर्णधार इशान किशनने ६ चौकार आणि १० षटकारांचा साहाय्याने ४९ चेंडूत १०१ धावांची खेळी केली. तर कुमार कुशाग्रने ३८ चेंडूत ८१ धावांची तुफानी खेळी केली.



## युजवेंद्र चहलला २ गंभीर आजारांची झालीये लागण

नवी दिल्लीः भारतीय क्रिकेट संघातील अनुभवी लेग स्पिनर युजवेंद्र चहल यांची तब्येत बिघडली आहे. डॉक्टरांनी त्यांना डेंग्यू आणि चिकनगुनिया या दोन गंभीर आजारांचे निदान केले आहे. त्यामुळे ते काही आठवडे क्रिकेटपासून दूर राहणार आहेत.

टीम इंडियाचा लेग स्पिनर युजवेंद्र चहलला डेंग्यू आण चिकुनगुनियाची लागण झाल्याचं समोर आलं आहे. यामुळे आता चहल पुढचा काही काळ क्रिकेट खेळू शकणार नाही. गुरुवारी चहलने त्याच्या तब्येतीबाबत माहिती दिली. आजारपणामुळे चहलला सैयद मुश्ताक अली ट्रॉफीचा फायनल सामनाही खेळता आला नाही. चहलने स्वतः याबाबत माहिती दिली. युजवेंद्र चहलची तब्येत बिघडली. चहलने त्याचा शेवटचा सामना सैयद मुश्ताक अली ट्रॉफीमध्ये खेळला. गेल्या महिन्यात तो हरियाणाकडून ग्रुप मॅचमध्ये खेळला होता. त्यानंतर आता त्याला डेंग्यू आणि चिकुनगुनिया झाल्याची माहिती आहे. या आज-ारणामुळे तो पुढचे काही महिने क्रिकेटच्या मैदानाप-ासून गूर राहणार आहे. ३० नोव्हेंबरपासून तो देशांतर्गत क्रिकेटमधून देखील बाहेर आहे. गुरुवारी पुण्यात झालेल्या झारखंड विरूद्धचा

## अमेरिकेच्या भूमीवर क्रिकेटचा नवा अध्याय; ला-ग्रेंजमध्ये भव्य क्रिकेट स्टेडियमचं उद्घाटन

न्यु यार्क क्रिकेट हा खेळ जगभरात लोकप्रिय आहे, परंतु अमेरिकेत त्याचा विस्त-ार तुलनेने कमी होता. आता या खेळाला अमेरिकन भूमीवर नवा अध्याय मिळाला आहे. ला ग्रेंज मध्ये भव्य क्रिकेट स्टेडियमचे उद्घाटन करण्यात आलंय.अमेरिकेतही आता क्रिकेटचा विकास होताना दिसतोय. याचं कारणं म्हणजे जॉर्जिया जवळील ला-ग्रेंजमध्ये 'ला-ग्रेंज क्रिकेट स्टेडियम' या अत्याधुनिक मैदानाचे अधिकृत उद्घाटन करण्यात आलं. ला-ग्रेंज क्रिकेट होल्डिंग्ज या संस्थेच्या माध्यमातून उभारलं जाणारे हे स्टेडियम २०२७ मध्ये खुले होणार आहे. यामुळे अमेरिकेत क्रिकेटसाठी कायमस्वरूपी घर ठरणार आहे आणि या प्रदे-शातील खेळाची ओळख तयार होण्यास मदत होणार आहे.

कसं आहे हे स्टेडियम?

आंतरराष्ट्रीय दर्जा लक्षात घेऊन बांधलेलं हे स्टेडियम ४५ एकरांवर पसरलंय. या ठिकाणी १०,००० कायमस्वरूपी सीट्स असणार आ-हेत. एखादा मोठा कार्यक्रम करायचा झाला तर ही क्षमता २५,००० पर्यंत वाढवता येणार आहे. हे मैदान राष्ट्रीय त्याचप्रमाणे आंतरराष्ट्रीय सामने आयोजित करण्यास सक्षम असण-ार आहे. ज्यामुळे ला-ग्रेंज जागतिक क्रिकेट परिसंस्थेतील एक महत्त्वाचे केंद्र ठरणार आहे.




# भारत- पाकिस्तान पुन्हा एकदा फायनलमध्ये भिडणार?

**सेमीफायनल चे सामने केव्हा, कधी**

**नवी दिल्ली:** भारत आणि श्रीलंका यांच्यात होणारा सामना सेमीफायनलचा सामना लाईव्ह कुठे पाहता येणार?

भारताचा युवा फलंदाज आयुष म्हात्रेच्या नेतृत्वाखाली खेळणारा संघ आणखी एक मोठी स्पर्धा जिंकण्याच्या उंबरठ्यावर आहे. भारतीय संघाने दुबईत सुरू असलेल्या अंडर १९ एशिया कप २०२५ स्पर्धेतील सेमीफायनलमध्ये प्रवेश केला आहे. भारतीय संघाचा सेमीफायनलचा सामना श्रीलंकेविरूद्ध होणार आहे. दरम्यान हा सामना केव्हा, कधी आणि कुठे खेळ-वला जाणार? आणि लाईव्ह कुठे पाहता येणार? जाणून घ्या संपूर्ण माहिती.अंडर १९ एशिया कप स्पर्धेतील सेमीफायनलमध्ये प्रवेश करणारे ४ संघ ठरले.अंडर १९ एशिया कप स्पर्धेतील साखळी फेरीतील सामने समाप्त झाले आहेत. आता बाद फेरीतील सामन्यांना सुरूवात होणार आहे. भारत आणि पाकिस्तानसह बांगलादेश आणि



श्रीलंका या संघांनी सेमीफायनलमध्ये आपलं स्थान निश्चित केलं आहे. भारतीय संघाचा सेमीफायनलचा सामना श्रीलंकेविरूद्ध होणार आहे. तर दुसरीकडे पाकिस्तानचा सामना बांगलादेशविरूद्ध खेळवला जाणार आहे. त्यामुळे पुन्हा एकदा भारत आणि पाकिस्तान हे दोन्ही संघ आशिया चषक स्पर्धेतील अंतिम सामना खेळण्यासाठी आमनेसामने येऊ शकतात.भारत आणि श्रीलंका या दोन्ही संघांमध्ये होणारा पहिला सेमीफायनलचा सामना १९ डिसेंबरला खेळवला जाणार आहे. हा सामना दुबईतील आयसीसी ॲकेडमीच्या मैदानावर खेळ-वला जाणार आहे. तर बांगलादेश आणि पाकिस्तान या दोन्ही संघांमध्ये दुसऱ्या सेमीफायनलचा थरार रंगणार आहे. हा साम ना दुबईतील द सेवन स्टेडियममध्ये खेळ-वला जाणार आहे. हे दोन्ही सामने एकाच वेळी खेळवले जाणार आहेत. हा सामना सकाळी साडे दहा वाजता सुरू होणार आहे. तर दहा वाजता टॉस होणार आहे. ही स्पर्धा वनडे फॉरमॅटमध्ये खेळवली जात आहे. त्यामुळे संध्याकाळपर्यंत फायनलमध्ये जाणाऱ्या संघांचा निकाल लागेल. यशस्वी जैस्वालला मुंबईच्या सामन्यादरम्यान अच-ानक हॉस्पिटलमध्ये केलं दाखल, हेल्थ अपडेट आली समोर

लाईव्ह कुठे पाहता येणार?

आशिया चषक स्पर्धेतील सेमीफायनलचा थरार तुम्ही सोनी स्पोर्ट्सवर लाईव्ह पाहू शकता. जर तुम्ही हा सामना टीव्हीवर पाहत असाल, तर तुम्हाला हा सामना

## मेस्सीच्या कार्यक्रमामध्ये झालेल्या गोंधळाची चौकशी एसआयटीकडे

कोलकाता-अवघ्या फुटबॉल विश्वाला आपल्या कवेत घेऊन फिरणारा अर्जेंटिनाचा विश्वविजेता फुटबॉल कर्णधार लिओ-नेल मेसी खास भारत भेटीसाठी आला खरा, पण त्याची झलकही सर्वसामान्य प्रेक्षक बघू शकला नसल्यामुळे भारतीय फुटबॉलचे माहेरघर असलेल्या सॉल्ट लेक मैदानावर गोंधळ झाल्याचे पाहायला मिळाले.कोलकाता येथील सॉल्ट लेक मैदानावर मेस्सीला प्रत्यक्ष पाहण्यासाठी चाहत्यांनी हजारो रुपये मोजले होते. मात्र मेस्सी मैदानात फार वेळ न थांबल्यामुळे संतप्त झालेल्या चाहत्यांनी मैदानात घुसण्याचा प्रयत्न केला. काहींनी खुर्च्या आणि बाटल्या फ ेकत निषेध व्यक्त केला. या संपूर्ण घटनेचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. या

### अटकेची संख्या ६ वर

घटनेच्या पार्श्वभूमीवर कोलकाता राज्य सरकारने स्थापन केलेल्या एसआयटीने काल (१८ डिसेंबर)ला सॉल्टलेक स्टेडियमला भेट देत गोंधळ घालणाऱ्यांपैकी एकाला सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे अटक केली आहे, ज्यामुळे अटक झालेल्यांची संख्या सहा झाली आहे. दुसरीकडे, पोलिसांच्या अपयशामुळेच ही अनुचित घटना घडली. पोलीस हे राज्य सरकारचे कठपुतळी आहेत, त्यामुळे राज्य पोलीस एसआयटीमध्ये असतील तर निष्पक्ष चौकशी होऊ शकत नाही. पोलीस काम करत आहेत हे दाखवण्यासाठी निष्पाप तरुणांना अटक केली जात आहे. भगवा छावणी त्या सर्वांना कायदेशीर मदत करेल.




# प्रसिद्ध बॉडी बिल्डरचं वयाच्या ३० व्या वर्षी निधन; धक्कादायक कारण आलं समोर

**बिजिंग :** आठ वेळा चॅम्पियन आणि आयएफबीबी सदस्य असलेले प्रसिद्ध चिनी बॉडी बिल्डर वांग कुनचं ३० व्या वर्षी निधन झालंय. हृदयविकाराच्या आजाराने त्याचे निधन झाले. ज्यामुळे फिटनेस जगाला धक्का बसला.

सलग ८ वेळा बॉडी बिल्डिंग पुरस्कार जिंकले होते.चीनच्या एका प्रसिद्ध बॉडी बिल्डर वांग कुनचं वयाच्या ३० व्या वर्षी निधन झालं. कमालीचं फिटनेस आणि ध्यान साधना करणाऱ्या बॉडी बिल्डरचं कमी वयात निधन झाल्यानं अनेकांना धक्का बसलाय. हाती आलेल्या माहितीनुसार, वांग कुनला हृदयविकार होता, त्याचकारणाने त्याचा मृत्यू झाल्याचं सांगण्यात येत आहे.

चीनच्या अनहुई शरीरसौष्ठव संघटनेने त्यांच्या मृत्यूची पुष्टी केलीय. वांग कुन यांच्या मृत्यूमुळे त्यांच्या जीवनशैलीबद्दल चर्चा सुरू झालीय. एका तपस्वी साधूसारखे जीवन जगत होते. जोमाने व्यायाम करत होते आणि अतिशय मध्यम आहार घेत होता.वांग कुन हे एक खेळाडू होता, त्याने इंटरनेशनल फ ेडरेशन ऑफ बॉडी बिल्डिंग अँण्ड फिटनेस प्रोफेशनलचा सदस्य होता. बॉडी बिल्डिंगसाठी ही चीनमधील म ोठी संस्था आहे. वांग कुनने सलग ८




वेळा बॉडी बिल्डिंग म्हणजेच शरीरसौष्ठवचा पुरस्कार जिंकलाय. हे पुरस्कार त्यांना चीनच्या बॉडी बिल्डिंग असोसिएशनकडून मिळाले होते.

त्याने अनेकवेळा नॅशनल बॉडी बिल्डिंगच्या चॅम्पियनशीपच्या स्पर्धेत भाग घेतला होता. तो दिवसा-तील बहुतेक वेळ व्यायाम करण्यात घालवत. आपल्या डाएट आणि ट्रेनिंगसाठी ओळखले जात. चिकन खाणे आणि सूप पिणे हे त्यांच्या डाएटमध्ये होते.अनेक मुलाखतीत वागं कुन यांनी आपल्या डाएट आणि धान्य साधनेविषयी सांगितलंय. तो एखाद्या बौद्ध भिक्षू सारखे जीवन जगत होते. आकर्षक आणि पिळदार शरीरयष्टी कायम राहण्यासाठी ते खूप जपून राहत होते. ते निवडक पदार्थांचे सेवन करत. वक्तशीरपणाम ुळे त्याची वेगळी ओळख निर्माण झाली होती. त्याने अनेक ठिकानी जिम सुरू केल्या आहेत. त्यामुळे त्याला मसल फॅक्टरी नावाने देखील ओळखलं जात. ही नवीन जिम चेन त्याच्यासाठी एक नवीन सुरुवात असेल आणि एक नवीन जग असेल,

# लातूरकरांसाठी तणावमुक्त व निरोगी जीवनाची अनोखी पर्वणी
# ब्रह्मा कुमारीज तर्फे भव्य प्रबोधन सोहळ्याचे आयोजन

**लातूर/प्रतिनिधी :** सध्याच्या अशांत वातावरणात जगाला मनाची शांती आणि सकारात्मकतेची नितांत गरज आहे. हीच गरज ओळखून, ब्रह्मा कुमारीज, लातूर सेवाकेंद्राच्या वतीने २१ डिसेंबर रोजी सायंकाळी ६.३० वाजता विशेष विश्व शांती मेडिटेशन सत्राचे आयोजन ब्रह्मा कुमारी सेवाकेंद्र, ब्रह्मा कुमारी चौक, राजयोग भवन , जूना औसा रोड येथे करण्यात आले आहे.

दरवर्षी २१ डिसेंबर हा दिवस जगभरात आंतरराष्ट्रीय मेडिटेशन दिवस किंवा विशेष शांती दिवस म्हणून पाळला जातो. याचे औचित्य साधून, लातूर येथील सेवाकेंद्रावर सायंकाळी ६.३० ते ७.३० या वेळेत ठीक एक तास सामूहिक राजयोग मेडिटेशन केले जाणार आहे.

कार्यक्रमाचा उद्देश: या विशेष सत्राचा मुख्य उद्देश जगभरात शांती, सलोखा आणि प्रेमभावनेच्या लहरी () पोहोचवणे हा आहे.



जेव्हा अनेक व्यक्ती एकाच वेळी, एकाच शुभ संकल्पाने सामूहिक ध्यान करतात, तेव्हा त्यातून निर्माण होणारी सकारात्मक ऊर्जा पर्यावरणातील नकारात्मकता नष्ट करण्यास आणि समाजात शांतता प्रस्थापित करण्यास मदत करते. या एक तासाच्या सत्रात राजयोगाच्या माध्यमातून मनाची एकाग्रता साधून विश्वाच्या कल्याणासाठी शुभ संकल्प केले जातील.

तरी या अनोख्या आध्यात्मिक उपक्रमात आणि ईश्वरीय कार्यात लातूरच्या सर्व भाविक नागरिकांनी आणि शांतीप्रेमी बंधू-भगिनींनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे विनम्र आवाहन ब्रह्मा कुमारीज लातूर सेवाकेंद्राच्या संचालिका ब्रह्मा कुमारी नंदा दीदी च्या वतीने करण्यात आले आहे.

तसेच पुढे नंदा दीदी म्हणाल्या, सध्याच्या धावपळीच्या आणि स्पर्धात्मक युगात मानवी मनाला शांती आणि शरीराला आरोग्याची नितांत आवश्यकता आहे. याच उदात्त हेतूने, आणि २१ डिसेंबर रोजी होणाऱ्या आंतरराष्ट्रीय मेडिटेशन दिवसाचे औचित्य साधून, ब्रह्मा कुमारीज ईश्वरीय विश्व विद्यालय, लातूर सेवाकेंद्राच्या वतीने भव्य प्रबोधन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

हा सोहळा दिनांक २२ डिसेंबर २०२५, वार सोमवार रोजी सायंकाळी ठीक चार वाजता, दयानंद शिक्षण संकुल येथील दयानंद सभागृह, बार्शी रोड, लातूर येथे संपन्न होणार आहे.

या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजे आंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रख्यात मोटिव्हेशनल स्पीकर आणि राजयोग शिक्षिका राजयोगिनी ब्रह्मा कुमारी उषा बहनजी यांची उपस्थिती. त्या स्ट्रेस मॅनेजमेंट (तणाव मुक्ती) या विषयावर उपस्थितांना मार्गदर्शन करतील. राजयोगाच्या माध्यमातून मनाची एकाग्रता कशी साधावी आणि तणावमुक्त आनंदी जीवन कसे जगावे, याचे अमूल्य मार्गदर्शन त्यांच्या ओजस्वी वाणीतून लातूरकरांना लाभणार आहे. शरीर हेच मानवी जीवनाचे ध्येय साध्य करण्यासाठी आद्य साधन आहे, हे लक्षात घेऊन प्रसिद्ध आहारतज्ज्ञ डॉ. सुधीर बनशेळगीकर हे डाएट मॅनेजमेंट (आहार नियोजन) या विषयावर संवाद साधतील. बदलत्या जीवनशैलीत सुयोग्य आहार कसा असावा, याविषयी ते शास्त्रीय माहिती देतील.कार्यक्रमाची रंगत वाढवण्यासाठी आणि मनाला आत्मिक अनुभूती देण्यासाठी विशेष म्युझिकल इव्हिनिंग चे आयोजन करण्यात आले आहे. सुरेल संगीताच्या माध्यमातून उपस्थितांना शांततेचा अनुभव घेता येईल. हा कार्यक्रम सर्वांसाठी विनामूल्य असून, लातूरच्या सर्व सुजाण नागरिकांनी सहकुटुंब, सहपरिवार उपस्थित राहून या ज्ञानयज्ञाचा लाभ घ्यावा, असे आवाहन राजयोगिनी ब्रह्माकुमारी नंदा दीदी-संचालिका ब्रह्मा कुमारीज लातूर सेवाकेंद्राच्या वतीने करण्यात आले आहे.

## एम एस बिडवे अभियांत्रिकीचा विद्यार्थी यशवर्धन धोंडगेने जिंकले तब्बल २ लाख रुपये रोख बक्षीस

**लातूर/प्रतिनिधी :** नुकतेच गिटहब या संकेतस्थळातर्फ आयोजित हॅकेथॉन स्पर्धत एम एस बिडवे अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या संगणक शास्त्र विभागाच्या अंतिम वर्षाचा विद्यार्थी यशवर्धन धोंडगेने प्रथम व तृतिय पारितोषिक पटकावत तब्बल अनुक्रमे १,५०,००० व ५०,००० रु. रोख पारितोषिक जिंकले आहे. ही स्पर्धा प्रोग्रामींग लँग्वेज वापरून प्रोजेक्ट बनवण्याची होती. या स्पर्धेमध्ये इतर देशातील विद्यार्थी सुध्दा सहभागी झाले होते.

त्याच्या या दैदिप्यमान यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष श्री आदिनाथ सांगवे, उपाध्यक्ष श्री माधवराव पाटील चिंचोलीकर, सचिव श्री माधवराव पाटील टाकळीकर, सहसचिव श्री सुनील मिटकरी, कोषाध्यक्ष श्री विजय रेवडकर, कार्यकारी संचालक श्री प्रदीप दिंडेगावे, संचालक श्री राजेश्वर बुके, श्री बस्वराज एरटे, श्री काशिनाथ साखरे, सौ. ललिताताई पांढरे, श्री महेश हलगे, श्री बाबुराव तरगुडे, श्री गुरुलिंग धाराशिवे यांनी मनःपूर्वक अभिनंदन केले आहे. याप्रसंगी महाविद्यालयाचे परिसर संचालक डॉ मोहन बुके, प्राचार्य डॉ एस एम जगदे, उपप्राचार्य प्रा विरभद्र बाळे, निबंधक डॉ सौ ज्योती पाटील, संगणक विभाग प्रमुख डॉ एन एम हलगरे, प्राध्यापक व कर्मचारी यांनी यशवर्धनचे अभिनंदन व कौतुक केले आहे.

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ ललित कला केंद्राची निर्मिती
## 'इथेच टाका तंबू' नाटकाची मुंबईतील नाट्यरतन राष्ट्रीय महोत्सवासाठी निवड

**नाशिक/प्रतिनिधी :** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या ललित कला केंद्राने 'इथेच टाका तंबू' या दोन अंकी प्रायोगिक नाटकाची निर्मिती केली आहे. पद्मविभूषण रतन टाटा यांच्या स्मरणार्थ मुंबईत येत्या दिनांक २५ ते २८ डिसेंबर २०२५ दरम्यान होणाऱ्या 'नाट्य रतन' या बहुभाषिक राष्ट्रीय नाट्यमहोत्सवासाठी या नाटकाची निवड झाली आहे. विद्यापीठ ललित कला केंद्राचे प्रा. दत्ता पाटील लिखित व संचालक श्री. सचिन शिंदे यांचे दिग्दर्शन असलेले हे नाटक या महोत्सवात शनिवार दिनांक २७ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ११.३० वाजता माटुंगा येथील यशवंत नाट्यमंदिरात सादर होईल.

विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव, शास्त्रोक्त शिक्षण प्रशिक्षण व व्यासपीठ मिळावे म्हणून विद्यापीठातर्फे ललित कला केंद्राची उभारणी करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने



विद्यापीठाच्या कौशल्य विकासाच्या अन्य विविध उपक्रमांसोबत सांस्कृतिक क्षेत्रातही योगदान देण्यासाठी आणि नाट्यशास्त्र शिक्षणक्रमाच्या आजी माजी विद्यार्थ्यांना तज्ञ नामांकित कलावंतांच्या मार्गदर्शनातून प्रेरणा मिळण्याच्या दृष्टीने या प्रायोगिक नाटकाची निर्मिती करण्यात आली आहे. सदर नाट्यरतन महोत्सवात महाराष्ट्रातील व महाराष्ट्राच्या बाहेरील एकूण १२ हिंदी, मराठी व इंग्रजी नाटके सादर केली जाणार आहेत.

**पाटील - शिंदे जोडीचं नवं नाटक**

लेखक श्री. दत्ता पाटील व दिग्दर्शक श्री. सचिन शिंदे यांची हंडाभर चांदण्या, तो राजहंस एक, कलगीतुरा, दगड आणि माती, गढीवरच्या पोरी यासह अनेक प्रायोगिक नाटके महाराष्ट्रात व महाराष्ट्राबाहेरही गाजली आहेत. आता ''इथेच टाका तंबू'' हे प्रायोगिक नाटक एक वेगळा सामाजिक विषय घेऊन रंगभूमीवर येत आहे. त्यात ओंकार गोवर्धन, अमेय बर्वे, अश्विनी कासार, उमेश जगताप यांच्या भूमिका असून नेपथ्य, पार्श्वसंगीत, रंगमंच व्यवस्था, प्रकाशयोजना यासह निर्मितीच्या विविध तांत्रिक बाजू तज्ञांच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठाच्या नाट्यशास्त्राचे आजीमाजी विद्यार्थी सांभाळत आहेत. नाशिकमध्ये रविवार दिनांक २८ डिसेंबर रोजी दुपारी १२.३० वाजता




महाकवी कालिदास कलामंदिर येथे या नाटकाचा प्रयोग होईल. नाट्यरतन महोत्सवातील या नाटकाच्या निवडीबाबत विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांनी आनंद व्यक्त केला असून ललित कला केंद्राचे अभिनंदन केले आहे.

**विद्यापीठाच्या लौकिकात भर - कुलगुरू**

नाट्यविषयक शिक्षणक्रमाला चालना देणारे व विद्यापीठाच्या नावलौकिकात भर घालणारे हे प्रायोगिक नाटक आहे. ललित कला केंद्राच्या माध्यमातून नाटकासह लोककला, संगीत, नृत्य या क्षेत्रातही भक्कम पाठबळ उभे करून विद्यार्थी कलावंतांना व्यासपीठ उपलब्ध केले जाणार आहे. महाराष्ट्रातील प्रमुख शहरात या नाटकाच्या प्रयोगांद्वारे विद्यापीठाच्या शैक्षणिक उपक्रमांचा एक प्रकारे प्रसार आणि प्रचार होणार आहे. विद्यापीठाच्या ललित कला केंद्राची ही पहिलीच निर्मिती आहे. लेखक, दिग्दर्शक व कलाकार यांना स्पर्धात्मक रंगभूमीवर जिवंत प्रत्यक्ष अनुभव मिळण्याची मोठी संधी मिळणार आहे. कलेच्या औपचारिक शिक्षणापासून वंचित असलेल्या विद्यार्थ्यांना विद्यापीठाशी जोडून घेण्यासाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरेल असे वाटते.

– मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे

# लातूर मनपा निवडणूक पार्श्वभूमीवर कॉंग्रेस भवन येथे इच्छुकांच्या मुलाखती संपन्न
## दिग्गज नेत्यांच्या मार्गदर्शनाखाली जोरदार मोर्चेबांधणी

**लातूर/प्रतिनिधी :** राज्य निवडणूक आयोगाकडून नुकताच राज्यातील २९ महापालिका निवडणुकीचा कार्यक्रम घोषित करण्यात आला असून या पार्श्वभूमीवर,लातूर शहर कॉंग्रेस कमिटीने या निवडणुकीसाठी कंबर कसली आहे.प्रदेश कॉंग्रेस कमिटीच्या सूचनेनुसार,लातुर मनपा निवडणुकीकरिता दि.१७ डिसेंबर व दि.१८ डिसेंबर २०२५ असे दोन दिवस कॉंग्रेस भवन,लातूर या ठिकाणी इच्छुक असलेल्या उमेदवारांच्या मुलाखती अत्यंत उत्साही वातावरणात पार पडल्या ज्याला उत्स्फूर्त असा प्रतिसाद देखील मिळाला.

राज्याचे माजी मंत्री,सहकार महर्षी दिलीपराव देशमुख,माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख,खा.डॉ.शिवाजी काळगे आणि लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष धीरज विलासराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली या मुलाखतींचे नियोजन करण्यात आलेले होते.

या मुलाखतींच्या वेळी निवड प्रक्रियेसाठी महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष तथा लातूर जिल्हा प्रभारी बाळासाहेब देशमुख,शहर जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे निरीक्षक डॉ. जितेंद्र देहाडे,शहर जिल्हाध्यक्ष-ॲड.किरण जाधव,प्रदेश सचिव-ॲड. ऍड.समद पटेल,माजी महापौर-ॲड.दीपक सूळ,माजी महापौर-प्रा.डॉ. स्मिताताई खानापुरे,माजी उपमहापौर- कैलास कांबळे,सेवादल शहराध्यक्ष-सुपर्ण जगताप,



अल्पसंख्यांक विभागाचे शहराध्यक्ष-ॲड.फारुक शेख,ओबीसी विभागाचे शहराध्यक्ष- चंद्रकांत धायगुडे,अनुसूचित जाती विभागाचे शहराध्यक्ष प्रा. प्रवीण कांबळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

दोन दिवसांचे नियोजनबद्ध सत्र निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता आणि सुसूत्रता राहावी यासाठी प्रभागांनुसार मुलाखतींचे वेळापत्रक ठरवण्यात आले होते यानुसार १७ डिसेंबर सकाळी ९ ते दुपारी ४ वाजेपर्यंत प्रभाग १ ते १२ मधील इच्छुकांच्या मुलाखती घेण्यात आल्या तर १८ डिसेंबर रोजी सकाळी ९ ते दुपारी १ वाजेपर्यंत प्रभाग १३ ते १८ मधील उर्वरित इच्छुकांशी संवाद साधण्यात आला.

अंतिम यादीची प्रक्रिया सुरू या दोन दिवसीय मुलाखतींच्या माध्यमातून प्रत्येक प्रभागातील जनसंपर्क,पक्षाप्रती निष्ठा आणि निवडून येण्याची क्षमता या निकषांवर उमेदवारांची चाचपणी करण्यात आली.या मुलाखतींनंतर आता महापालिका निवडणुकीसाठी कॉंग्रेस पक्षाच्या उमेदवारांची अंतिम यादी निश्चित करण्याची प्रक्रिया सुरू होणार असल्याची माहिती लातुर शहर जिल्हा कॉंग्रेस अध्यक्ष ॲड.किरण जाधव यांनी दिली.

लातूर शहरात कॉंग्रेसची पकड मजबूत करण्यासाठी आणि सर्व समाजघटकांना योग्य प्रतिनिधित्व देण्यासाठी पक्षश्रेष्ठींकडून विशेष खबरदारी घेतली जात असल्याचे या प्रक्रियेवरून स्पष्ट होत आहे.

# महाऊर्जा तर्फे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथे ऊर्जा प्रबंधन संस्थात्मक प्रशिक्षण कार्यक्रम

**लातूर/प्रतिनिधी :** अपारंपरिक ऊर्जा स्त्रोतांचा वापर वाढविणे व ऊर्जा संवर्धनासाठी ''राष्ट्रीय ऊर्जा संवर्धन सप्ताह दि. १४ ते २० डिसेंबरदरम्यान जिल्ह्यात महाऊर्जा तर्फे जनजागृती कार्यक्रम राबविण्यात येत आहे. महाऊर्जा विभागीय कार्यालय आणि शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ऊर्जा बचत कार्यक्रमास विद्यार्थ्यांचा चांगला प्रतिसाद मिळाला. ऊर्जा ऑडिटर केदार खमितकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. नवीन व नवीकरणीय ऊर्जेचे तसेच ऊर्जा बचतीचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत चाललेले आहे.

आजही जवळपास ६० टक्केपेक्षा जास्त ऊर्जा निर्मिती ही औष्णिक ऊर्जा निर्मिती पध्दतीने केली जाते. तथापि पारंपरिक पध्दतीने ऊर्जा निर्मिती करतांना पर्यावरणामध्ये ग्रीन हाऊस गॅसेस सोडले जातात. यामध्ये कार्बन, क्लोराईड, नायट्रोजन, सल्फेट यांचा अंतर्भाव असतो. या वायुंचा पर्यावरणावर विपरीत परिणाम होत असून जागतिक उष्णतामान वाढत आहे. याची आपण सर्वांना जाणीव आहे. पारंपरिक ऊर्जा निर्मितीचे स्त्रोत सिमीत असल्याने सद्य:स्थितीत नित्यनूतनशील ऊर्जा व ऊर्जा बचतीशिवाय पर्याय नाही असे खमितकर म्हणाले. कार्यक्रमात मालकुंजे सर , आनंद शेंद्रे सर, रोशन राठोड, बाराते व्हि. ए. , हेमंत खांडेकर, घोबाळे जे एस, राठोड एस.बी. इत्यादी अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

या सप्ताहात जिल्ह्यातील प्राथमिक व माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांमार्फत ऊर्जा संकट व अपारंपरिक ऊर्जा स्त्रोतांचा वापराविषयी जनजागृती करण्यात येणार आहे, अशी माहिती महाउर्जाचे प्रकल्प अधिकारी सागर कुलकर्णी यांनी दिली. राष्ट्रीय ऊर्जा संवर्धन सप्ताहामध्ये शाळा व महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांमार्फत ऊर्जा संकटाबाबत जनतेमध्ये जनजागृती तसेच अपारंपरिक ऊर्जा स्त्रोतांचा वापराविषयी प्रबोधनात्मक संदेश लोकांपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे. देशभरामध्ये ऊर्जा बचतीचा कार्यक्रम मोठया प्रमाणावर राबविण्याच्या दृष्टीने केंद्र शासनाने ऊर्जा संदर्भात कायदा २००१ लागू केला आहे. या कायद्याच्या तरतूदींच्या अंमलबजावणीसाठी ब्युरो ऑफ एनर्जी एफिशियंसी (बी.इ.इ.) या संस्थेची स्थापना करण्यात आली आहे. राष्ट्रीय ऊर्जा संवर्धन दिन साजरा करण्यासाठी ऊर्जा मंत्रालय आणि बी.इ.इ. तर्फे औद्योगिक, निवासी इमारत, महाविद्यालय व विद्यापीठ क्षेत्रांना राष्ट्रीय ऊर्जा संवर्धन पारितोषिक व लहान मुलांसाठी राष्ट्रीय ऊर्जा संवर्धन चित्रकला स्पर्धेचे आयोजन केले जाते.

MAHAVITARAN
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

**Invitation for Bids on e-Tendering Basis**

Tenders in e-tendering format are invited vide **Tender Nos: EE/TJR/TS/T-08/2025-26, EE/TJR/TS/T-09/2025-26, EE/TJR/TS/T-10/2025-26, EE/TJR/TS/T-11/2025-26** for Work of Transportation, Loading & Unloading of Failed & Repaired Distribution Transformers, Other MSEDCL Materials from Pole Factories, Transformer Repair Agencies, Various Major Stores to different work sites / Filter Unit & Vice Versa under the Jurisdiction of O & M Sub-Division, **Lohara, Omerga, Tuljapur and Naldurg** respectively under O & M Division, Tuljapur.

| Sr. No. | Tender No. | Name of Work | Tender Amount in Rs. |
|---|---|---|---|
| 1 | EE/TJR/TS/ T-08/2025-26, EE/TJR/TS/ T-09/2025-26, EE/TJR/TS/ T-10/2025-26, EE/TJR/TS/ T-11/2025-26 | Work of Transportation, Loading & Unloading of Failed & Repaired Distribution Transformers, Other MSEDCL Materials from Pole Factories, Transformer Repair Agencies, Various Major Stores to different work sites / Filter Unit & Vice Versa under the Jurisdiction of Sub-Division, **Lohara, Omerga and Tuljapur and Naldurg** under O & M Division, Tuljapur | Rs. 20.00 Lakh (Excluding GST) Each tender amt. |

Details of Tender Term & condition is available on MSEDCL's Web Site **http://works.mahadiscom.in/eTender/etender.** The Employer reserves the right to accept any bid, or reject any or all bids, without assigning any reason therefore and without thereby incurring any liability to the Bidder or Bidders. For any query contact person Ex. Engineer Dharashiv Division. Contact no. 7875762016.

**Sd/- Executive Engineer**
**MSEDCL Division Office, Tuljapur**

**PRO No: LTR No. 153 Dt.18/12/2025**



यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ ललित कला केंद्राची निर्मिती असलेल्या 'इथेच टाका तंबू' या प्रायोगिक नाटकाच्या संहितेसह विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे, नाट्यलेखक प्रा. दत्ता पाटील, दिग्दर्शक श्री. सचिन शिंदे व नाट्यकलावंत.

**प्रो. जडे यांचे रबरी शिक्के**
**कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले टिकाऊ रबरी शिक्के तयार करून मिळतील.**



शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# राजमाता जिजाऊ मध्यवर्ती जन्मोत्सव समितीच्या अध्यक्षपदी प्रणीता पंकज पाटील




धाराशिव ( शेख अंजुम ) – शहरात गेल्या १८ वर्षांपासून राजमाता जिजाऊ यांची जयंती उत्साहात साजरी करणाऱ्या मध्यवर्ती जिजाऊ जन्मोत्सव समितीच्या यावर्षीच्या अध्यक्षपदी प्रणीता पंकज पाटील यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली यंदाही जिजाऊ जयंतीनिमित्त विविध सामाजिक, सांस्कृतिक व जनहिताचे उपक्रम राबविले जाणार आहेत.

दरवर्षी १२ जानेवारीपासून जिजाऊ जयंतीनिमित्त उपक्रमांची सुरुवात होत असून वर्षभर समितीच्या वतीने समाजासाठी उपयुक्त असे कार्यक्रम आयोजित केले जा-तात. समाजातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान करण्यासाठी राजमाता जिजाऊ पुरस्कार, लोकराजा राजर्षी शाहू समाजभूषण पुरस्कार, स्वराज्य संकल्पक शाहाजीराजे क्रीडाभूषण पुरस्कार तसेच कर्मवीर मामासाहेब जगदाळे शिक्षकरत्न पुरस्कार प्रदान करण्यात येतात.

पुरस्कार वितरणासोबतच मान्यवरांची व्याख्याने, पुस्तक प्रदर्शन, भव्य रक्तदान शिबिरे यांसह अनेक उपक्रमांचे आयोजन केले जाते. याशिवाय, शहरातील स्त्री-रुग्णालयात रुग्णांना आवश्यक साहित्याचे वाटप करून सामाजिक बांधिलकी जपली जाते.

यावर्षी अध्यक्ष प्रणीता पंकज पाटील यांच्या नेतृत्वाखाली अधिक व्यापक व समाजाभिमुख कार्यक्रमांच्या माध्यमातून राजमाता जिजाऊ जन्मोत्सव साजरा केला जाणार असल्याची माहिती समितीच्या सदस्यांनी दिली आहे.

# लोकसभेत खासदार ओमराजे निंबाळकरांचा दुष्काळमुक्त महाराष्ट्रासाठी ठोस पुढाकार




नवी दिल्ली (प्रतिनिधी)– प्रतिनिधी लोकसभेच्या चालू हिवाळी अधिवेशनात खासदार मा. ओमराजे निंबाळकर यांनी महाराष्ट्रातील गंभीर दुष्काळी परिस्थितीवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी अत्यंत महत्त्वाचा विषय सभागृहात मांडला. पश्चिम वाहिनी नद्यांचे समुद्रात वाहून जाणारे पाणी दुष्काळग्रस्त भागात वळविण्याच्या नदीजोड प्रकल्पाची तातडीने अंमलबजावणी करण्याची ठाम मागणी त्यांनी केंद्र सरकारकडे केली.


वैतरणा, उल्हास, नारपार, औरंगा, दमणगंगा व अंबिका या पश्चिम वाहिनी नद्यांचे सुमारे ५५ टीएमसी पाणी नदीजोड प्रकल्पाच्या माध्यमातून महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांना उपलब्ध करून देण्याच्या प्रस्तावास महाराष्ट्र राज्य मंत्रिमंडळाने सप्टेंबर २०२४ मध्ये मान्यता दिली आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी डिसेंबर २०२५ अखेरपर्यंत सविस्तर प्रकल्प अहवाल (उ्झठ) सादर करण्यात येणार असून, या प्रकल्पाचा अंदाजे खर्च सुमारे ७० हजार कोटी रुपये इतका आहे.

या प्रकल्पाच्या माध्यमातून मराठवाडा तसेच राज्यातील इतर दुष्काळी भागात शेतीसाठी कायमस्वरूपी पाण्याची उपलब्धता निर्माण होणार असून, शेतकऱ्यांच्या जीवनमानात आमूलाग्र बदल घडून येईल, असा विश्वास खासदार ओमराजे निंबाळकर यांनी व्यक्त केला.

हा प्रकल्प केवळ राज्याच्या आर्थिक क्षमतेपुरता मर्यादित नसून, केंद्र सरकारने पुढाकार घेऊन आवश्यक आर्थिक व प्रशासकीय सहकार्य करावे, तसेच प्रकल्प वेळेत आणि वेगाने पूर्ण होण्यासाठी तात्काळ आवश्यक ती सर्व कार्यवाही करावी, अशी ठाम मागणी त्यांनी केंद्र शासनाकडे केली.

दुष्काळमुक्त महाराष्ट्राच्या दिशेने हा नदीजोड प्रकल्प मैलाचा दगड ठरेल, असे नमूद करत शासनाने या विषयाला सर्वोच्च प्राधान्य द्यावे, अशी अपेक्षाही खासदार ओमराजे निंबाळकर यांनी व्यक्त केली.

# जळकोटला बोरी धरणातून पाणीपुरवठ्याच्या पाईपलाईनचा जलजीवनच्या अधिकाऱ्याकडून कडून सर्वे



जळकोट (विजय पिसे)–जळकोट गावास जलजीवन मिशन अंतर्गत बोरी धरणातून पाईपलाईनद्वारे पाणीपुरवठा करण्याच्या योजनेच्या कामास प्रारंभ करण्याच्या दृष्टीने आज बोरी धरण परिसरात प्रत्यक्ष सर्व्हे करण्यात आला. हे जल जीवन मिशन अंतर्गत असलेले काम गेल्या दोन वर्षापासून बंद आहे. यामुळे अनेक दिवसापासून गाव पाण्याच्या प्रतीक्षेत आहे. हे काम लवकरात लवकर होण्यासाठी ग्रामपंचायतीच्या वतीने पत्रव्यवहार करून कामाची सुरुवात व्हावी यासाठी प्रयत्न केले आहेत. त्यामुळे या सर्वे वेळी महाराष्ट्र जलजीवन प्राधिकरण, धाराशिव येथील एक्झिक्युटिव्ह अभियंता नागदे साहेब, कार्यकारी अभियंता जाधव साहेब, महेश बप्पा कदम, जळकोट ग्रामपंचायत सदस्य कल्याणी साखरे, गुत्तेदार दीक्षित, तसेच सर्व्हे कर्मचारी मयूर व मुकेश ग्रामपंचायत कर्मचारी लहू कारले, मल्लिनाथ डांगे हे सर्व बोरी धरणाच्या साइटवर प्रत्यक्ष उपस्थित होते.

या पाणीपुरवठा योजनेमुळे जळकोट गावाचा कायमस्वरूपी पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लागण्यास मोठी मदत होणार आहे. बोरी धरणातून पाईपलाईनद्वारे शुद्ध व मुबलक पाणी गावात आणण्याचा मार्ग मोकळा झाला असून, योजनेचे काम लवकरात लवकर पूर्ण करून बोरी धरणाचे पाणी जळकोट ग्रामस्थांना उपलब्ध करून दिले जाईल, अशी ग्वाही सरपंच श्री. गजेंद्र कदम पाटील यांनी यावेळी दिली. ही योजना पूर्ण झाल्यानंतर जळकोट गावातील नागरिकांना नियमित, शुद्ध व पुरेशा प्रमाणात पाणीपुरवठा मिळणार असून, ग्रामविकासाच्या दृष्टीने हा एक अत्यंत महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे. जलजीवन मिशनअंतर्गत सुरू होणाऱ्या या कामामुळे जळकोट गावाच्या पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी मिटणार आहे.

# तुळजापूर येथे नूतन न्यायालयीन इमारतीचे उदघाटन

धाराशिव (जिमाका) तुळजापूर येथे उभारण्यात आलेल्या नूतन न्यायालयीन इमारतीचे उदघाटन शनिवार,दि.२० डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळी ६.१५ वाजता संपन्न होणार आहे.या नूतन इमारतीचे उद्‌घाटन सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती श्री.प्रसन्न वराळे यांच्या शुभहस्ते होणार असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती श्री.चंद्रशेखर हे असतील.

या उदघाटन समारंभास मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती सर्वश्री श्री.रविंद्र घुगे,न्यायमूर्ती श्रीमती.विभा कंकणवाडी व न्यायमूर्ती श्री.शैलेश ब्रह्मे यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.तसेच प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीमती अभिश्री देव यांचीही प्रामुख्याने उपस्थिती राहणार आहे.

हा उद्घाटन सोहळा तुळजापूर न्यायालयाच्या नवीन इमारतीत आयोजित करण्यात आला असून या नूतन इमारतीमुळे न्यायालयीन कामकाज अधिक सुलभ,गतिमान व नागरिकांसाठी सोयीचे होणार आहे. न्यायप्रक्रियेला भौतिक सुविधा उपलब्ध करून देणाऱ्या या इमारतीमुळे तुळजापूर व परिसरातील नागरिकांना मोठा लाभ होणार आहे.

या समारंभासाठी तुळजापूरच्या दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर), श्रीमती.स्वाती अवसेकर आणि विधीज्ञ मंडळ,तुळजापूरचे अध्यक्ष अँड.दत्तात्रय घोडके हे निमंत्रक असून या उदघाटन समारंभास उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

लातूर समाचार धाराशिव
बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क
9422472502
9175325708

# ऐनवेळी मिळालेल्या माहितीतून बालविवाह रोखला येडशी गावात प्रशासनाची तत्पर मानवतावादी कारवाई

धाराशिव (जिमाका)– जिल्ह्यातील येडशी येथे १६ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ऐनवेळी प्राप्त झालेल्या तक्रारीमुळे प्रशासनाने तत्काळ हालचाल करत ठीक सकाळी ११ वाजता होऊ घातलेला बालविवाह यशस्वीपणे रोखला. एका मुलीचे बालपण आणि उज्वल भविष्य वाचविण्यात प्रशासनाला मिळालेले हे यश समाजात सकारात्मक संदेश देणारे ठरले आहे.

प्रभारी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी किशोर गोरे,जिल्हा बाल संरक्षण अधिकारी अमोल कोवे तसेच जिल्हा समन्वयक विकास चव्हाण यांच्या मार्गदर्शनात धाराशिव तालुक्यातील येडशी गावात ही कारवाई करण्यात आली.बाल संरक्षणाच्या दृष्टीने संवेदनशीलता दाखवत संबंधित यंत्रणांनी तात्काळ पावले उचलली.

या कारवाईत बाल संरक्षण कक्षाच्या प्रज्ञा बनसोडे (सामाजिक कार्यकर्ता),चाईल्ड हेल्पलाईन कक्षातील अभय काळे (केस वर्कर),श्रीमती पल्लवी पाटील (सुपरवायजर) यांच्यासह पोलीस विभाग, ग्रामसेवक,अंगणवाडी सुपरवायजर, अंगणवाडी सेविका,सरपंच तसेच गाव ग्राम बाल संरक्षण समितीच्या सदस्यांनी प्रत्यक्ष घटनास्थळी उपस्थित राहून बालविवाह प्रतिबंध केला.

कारवाईदरम्यान पालकांचे समुपदेशन करण्यात आले.बालविवाहामुळे मुलीच्या आरोग्य,शिक्षण व भविष्यातील आयुष्यावर होणाऱ्या गंभीर परिणामांची जाणीव करून देण्यात आली.यानंतर पालकांकडून हमीपत्र लिहून घेण्यात आले.

वेळीच मिळालेली माहिती,प्रशासनाची तत्परता आणि विविध यंत्रणांमधील समन्वय यामुळे एका निष्पाप मुलीचे बालपण सुरक्षित राहिले. बालविवाहासारख्या सामाजिक अपप्रथांना रोखण्यासाठी समाजानेही सजग राहावे व कोणतीही शंका असल्यास तत्काळ प्रशासन किंवा चाईल्ड हेल्पलाईनशी संपर्क साधावा,असे आवाहन करण्यात आले आहे.

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**उत्पादन आणि पुरवठा कार्य**

विभागीय भांडार कार्यालय, मध्य रेल्वे, सोलापूर आणि मा.भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने, सक्षम, प्रतिष्ठित कंपन्या/कंत्राटदारांकडून खालील कामांसाठी रेल्वेच्या ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट **www.ireps.gov.in** वर ऑनलाइन ई-निविदा आमंत्रित करत आहेत. **निविदा क्रमांक: SUR/SR.DMM/T.NO. 96255648, दिनांक: १७.१२.२०२५. तपशील:** ६४०० मिमी ओव्हर रायडिंग डेरेलिंग स्विचेस १ इन ८.५, टी/आउट फॉर बीजी (१६७३ मिमी) ६० किलो पीएससी स्लीपर्सवर, RDSO रेखाचित्र क्र. T-6068 Alt.4 नुसार नवीनतम बदलांसह आणि निविदा बंद होण्याच्या प्रत्यक्ष तारखेपर्यंत जारी केलेल्या नवीनतम शुद्धिपत्रकासह IRS: T-10-2025 या तपशीलानुसार उत्पादन आणि पुरवठा. **प्रमाण:** ३६ सेट. **बयाणा रक्कम (INR):** रु. २१८३८०/-. **www.ireps.gov.in** वर **निविदा बंद होण्याची तारीख आणि वेळ:** १२.०१.२०२६ रोजी ११:३० वा. संभाव्य निविदाकारांना सल्ला दिला जातो की, या निविदेसाठी जारी केलेले कोणतेही बदल/शुद्धिपत्रक पाहण्यासाठी निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी वेबसाइटला वारंवार भेट द्यावी. वेबसाइट: **www.ireps.gov.in**

एसआर. डीएमएम/एसयूआर
मध्य रेल्वे, सोलापूर
DE/Sur-73

खतरनाक व विस्फोटक सामान के साथ यात्रा करना दंडनीय अपराध है

# धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६१२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ १ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२१४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४० २४)
२४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५)
२२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

# तुळजापूर बसस्थानकातून सोन्याच्या दागिणे व रोखरकमेची चोरी

तुळजापूर (प्रतिनिधी)– पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी किरण मनोज मोहळकर, रा. नामदेव मंदीर जवळ पंढरपुर ता. पंढरपुर या दि.१६.१२.२०२५ रोजी बसस्थानक तुळजापूर येथे बसमध्ये चढत असताना अज्ञात व्यक्तीने गर्दीचा फायदा घेवून किरण मोहळकर यांचे ५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम २०,००० असा एकुण ४५,००० किंमतीचा माल चोरुन नेला. दिलेल्या प्रथम खबरेवरुन तुळजापूर पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

## Name of change Declaration

Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : **MOMIN NAZIYA PARVEEN ASHFAQUE AHMED.**
TO **MOMIN NAZIYA PARVIN NAZIRODDIN.**
Hence for this Declaration i will be known by this name and will use . in future the MOMIN NAZIYA PARVIN NAZIRODDIN will used by my family husband /wife, children and relative.
OLD NAME :- **MOMIN NAZIYA PARVEEN ASHFAQUE AHMED.**
NEW NAME:- **MOMIN NAZIYA PARVIN NAZIRODDIN.**
Address :- KHIRNI MALA, VAIRAG ROAD, OSNANABAD. DIST. OSMANABAD -413501
AADHAR NO.- 427317142363 Mob. No.-9422116611

## Name of change Declaration

Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : **MOMIN NAZIYA NAZIRODDIN.**
TO **MOMIN NAZIYA PARVIN NAZIRODDIN.**
Hence for this Declaration i will be known by this name and will use . in future the MOMIN NAZIYA PARVIN NAZIRODDIN will used by my family husband /wife, children and relative.
OLD NAME :- **MOMIN NAZIYA NAZIRODDIN.**
NEW NAME:- **MOMIN NAZIYA PARVIN NAZIRODDIN**
Address :- KHIRNI MALA, VAIRAG ROAD, OSNANABAD. DIST. OSMANABAD -413501
AADHAR NO.- 427317142363 Mob. No.-9422116611

## Name of change Declaration

Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : **MOMIN NAZIRODDIN ANVARODDIN**
TO **MOMIN NAZIRODDIN ANWARODDIN.**
Hence for this Declaration i will be known by this name and will use . in future the MOMIN NAZIRODDIN ANWARODDIN will used by my family husband /wife, children and relative.
OLD NAME :- **MOMIN NAZIRODDIN ANVARODDIN**
NEW NAME:- **MOMIN NAZIRODDIN ANWARODDIN.**
Address :- KHIRNI MALA, VAIRAG ROAD, OSNANABAD. DIST. OSMANABAD -413501
AADHAR NO.- 625170161619 Mob. No.-9422116611

## CHANGE IN NAME

I have change my name from NASIRODDIN MAHEBOOB KAZI TO NASIRODDIN MAHEBUB KAZI Hence for this declaration in future will use the name NASIRODDIN MAHEBUB KAZI the same name will be used by wife and Children.
**OLD NAME:-** NASIRODDIN MAHEBOOB KAZI
**NEW NAME:-** NASIRODDIN MAHEBUB KAZI
**ADDRESS:**
MILI COLONY, YEDSHI ROAD, DHARASHIV
MAHARASHTRA 13581

सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.
Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649